शनिवार, १ ऑक्टोबर २०२२ ◆ वर्ष १५ ◆ अंक ७४
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## मुख्यमंत्री शिंदे गटाकडून युवासेनेची कार्यकारिणी जाहीर

**मुंबई** : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाकडून युवासेनेची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये कोकण, उत्तर व पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भासह राज्यात वेगवेगळ्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती केली गेली आहे. युवासेनेची कार्यकारिणी जाहीर केल्यानंतर शिंदे गटाचे प्रवक्ते किरण पावसकर यांनी अधिक माहिती दिली. आदित्य ठाकरे यांच्यासोबत युवासेनेत काम करणारी युवा फळी आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत आली आहे, असे पावसकर यांनी सांगितले. एकनाथ शिंदे यांनी आपलीच शिवसेना खरी असल्याचे सांगत उठाव केल्यानंतर त्यांच्या गटाची नवी कार्यकारिणी जाहीर केली होती. त्यानंतर आता शिंदे गटाकडून युवासेनेचीही कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. त्यामुळे शिंदे गटाकडून उद्धव ठाकरे यांच्यासाठी हा धक्का असल्याचे बोलले जात आहे.

अंतरंग
पर्यटनात कोकणाची बाजी; तब्बल चार राष्ट्रीय पुरस्कार/२
माथेरानच्या समस्या सोडविणार; पालकमंत्र्यांचे आश्वासन/५
टी-२० वर्ल्डकपसाठी बुमराहच्या जागी सिराजला संधी/८

## आजपासून इंटरनेट सुपरफास्ट!

### ५जी सेवेचा पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते होणार शुभारंभ

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**
तंत्रज्ञानाच्या नव्या युगात भारत प्रवेश करीत आहे. १ ऑक्टोबरपासून देशात सुपरफास्ट इंटरनेट सेवा सुरू होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते राजधानी दिल्लीतील प्रगती मैदानावर सकाळी १० वाजता ५जी सेवेचा शुभारंभ होईल. ५जी तंत्रज्ञानामार्फत चांगले कव्हरेज, जास्त डेटा, कमी विलंब आणि विश्वासार्ह संवाद सुविधा प्राप्त होणार आहेत. ५जी तंत्रज्ञान ऊर्जा, स्पेक्ट्रम व नेटवर्क सक्षमताही वाढवेल.






## मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या हस्ते नवीन पनवेलमध्ये कार्यक्रम



**पनवेल** : पंतप्रधान नरेंद्र मोदी देशात, तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शनिवारी (दि. १) सकाळी नवीन पनवेलमध्ये ५जी सेवेचा शुभारंभ राज्यात करणार आहेत. ही सेवा सुरू करण्यासाठी राज्यातील तीन शाळांची निवड करण्यात आली असून त्यात पनवेल महापालिकेच्या नवीन पनवेलमधील पोदी येथील ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले शाळेचा समावेश आहे. पंतप्रधान मोदी दिल्लीतून ५जी सेवेचा शुभारंभ सकाळी १० वाजता करणार आहेत. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री शिंदे पोदी शाळेत उपस्थित राहून राज्यात शुभारंभ करतील. या वेळी पंतप्रधान ५जी सेवेमार्फत मुख्यमंत्री, विद्यार्थी, शिक्षकांशी संवाद साधणार आहेत. यानंतर मुख्यमंत्री कामोठे येथील रामशेठ ठाकूर विद्यालय, पनवेलमधील महात्मा व डीएव्ही शाळेतील विद्यार्थी, शिक्षकांशी संवाद साधतील. या वेळी रायगडचे पालकमंत्री उदय सामंत, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक मनोज भुजबळ, जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर, आयुक्त गणेश देशमुख उपस्थित राहणार आहेत.

# स्वच्छ महाराष्ट्र अभियान २.०चा शुभारंभ

## शहर सौंदर्यीकरण व स्वच्छतेबाबत स्पर्धा जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**
स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी (२.०)चा शुभारंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. ३०) करण्यात आला. या अभियानांतर्गत शहरांसाठी शहर सौंदर्यीकरण व स्वच्छतेबाबत स्पर्धेची घोषणा या वेळी करण्यात आली.



या कार्यक्रमास शालेय शिक्षणमंत्री तथा मुंबई शहराचे पालकमंत्री दीपक केसरकर, आमदार प्रताप सरनाईक, मुंबई महापालिकेचे आयुक्त इकबालसिंह चहल, वॉररूमचे महासंचालक राधेश्याम मोपलवार उपस्थित होते.

स्वच्छता अभियानात महाराष्ट्र नेहमीच अग्रेसर असून आता स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत स्वच्छ, सुंदर आणि कचरामुक्त शहरे ही लोकचळवळ बनणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या वेळी केले, तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, शहरीकरण हा अभिशाप नसून शहरीकरणाचे आता सुनियोजित व्यवस्थापन करण्याची गरज आहे. शहरे ही विकासाची केंद्र असून शहरातच रोजगार निर्मिती मोठ्या प्रमाणावर होते. स्वच्छतेत राज्य नेहमीच अग्रेसर असून २०१७मध्ये हागणदारीमुक्त झाले. यापुढील काळात स्वच्छ आकांक्षी स्वच्छतागृहे परिवर्तन घडवून आणतील.

या वेळी स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.०-कचरामुक्त शहरे या तसेच घनकचरा आयसीटी या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. त्याचप्रमाणे या अभियानास सहकार्य करणाऱ्या संस्थांशी करारांची देवाणघेवाणही झाली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच अन्य मान्यवरांनी या वेळी स्वच्छता अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांची तसेच प्रकल्प व यंत्रणांची माहिती देणाऱ्या प्रदर्शनाची पाहणी केली.

मुख्यमंत्री कार्यालयातील वॉररूमचे महासंचालक राधेशाम मोपलवार यांनी वॉररूमबद्दल माहिती दिली. ते म्हणाले, मुख्यमंत्री कार्यालयातील वॉररूमद्वारे महत्त्वाच्या योजना, प्रकल्प या संदर्भात धोरणात्मक विचार व समन्वयन करण्यात येते. प्रास्ताविक नगरविकास विभागाच्या प्रधान सचिव डॉ. सोनिया सेठी यांनी केले, तर नगर परिषद प्रशासन संचालनालयाचे आयुक्त तथा संचालक किरण कुलकर्णी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## जीवनात मोठे होण्यासाठी ध्यास, मेहनत, आत्मविश्वास, त्याग आवश्यक

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे प्रतिपादन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**
जीवनात मोठे होण्यासाठी ध्यास, मेहनत, आत्मविश्वास, त्याग यांची आवश्यकता असते. जर हे गुण तुमच्या अंगी असतील, तर तुम्ही यशस्वी व्हाल, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुक्रवारी (दि. ३०) येथे केले. ते महात्मा फुले महाविद्यालयात आयोजित कर्मवीर भाऊराव पाटील जयंती कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत होते. (पान २ वर..)

### महात्मा फुले कॉलेज सभागृहास दोन कोटींची देगणी जाहीर

आपल्या मार्गदर्शनपर भाषणात लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी रयत शिक्षण संस्थेशी असणारे ऋणानुबंध व्यक्त करीत कर्मवीरांनी घालून दिलेला आदर्श आजही संस्था जोपासत त्यांचे स्वप्न पूर्ण करीत आहे याचा आपणास सार्थ अभिमान असल्याचे सांगितले. या वेळी त्यांनी संस्थेच्या व महात्मा फुले महाविद्यालयाच्या प्रगतीचे कौतुक केले आणि महाविद्यालयाच्या सभागृहास दोन कोटी रुपये देणगी जाहीर केली.

## निवडक

### काँग्रेस अध्यक्षपद निवडणुकीत खर्गे विरुद्ध थरूर लढत

**नवी दिल्ली** : काँग्रेस अध्यक्षपदाच्या निवडणूक रिंगणात ज्येष्ठ नेते मल्लिकार्जून खर्गे यांनी उडी घेतली आहे. त्यानंतर मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री दिग्विजय सिंह यांनी माघार घेत खर्गेंना पाठिंबा जाहीर केला. त्यामुळे शशी थरूर विरुद्ध खर्गे अशी थेट लढत होणार असल्याचे चित्र आहे. काँग्रेसने जाहीर केलेल्या अधिसूचनेनुसार बिनविरोध निवडणूक न झाल्यास १७ ऑक्टोबरला मतदान, तर १९ ऑक्टोबरला मतमोजणी व निकाल जाहीर होणार आहे.

### टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी कोट्यवधींची बक्षिसे जाहीर

**दुबई** : आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी एकूण ४५ कोटी रुपयांच्या बक्षिसांची घोषणा केली आहे. त्यानुसार विजेत्या संघाला १.६ मिलियन डॉलर म्हणजे १३ कोटी चार लाख रुपये, तर उपविजेत्याला निम्मी रक्कम मिळेल. याशिवाय जे संघ उपांत्य फेरीत पराभूत होतील त्यांना प्रत्येकी चार लाख डॉलर (तीन कोटी रुपये) आणि सुपर १२ फेरीत जे आठ संघ बाहेर पडणार आहेत त्यांना प्रत्येकी ७० हजार डॉलर (जवळपास ५७ लाख रुपये) मिळणार आहेत.

## कुपोषणाचे समूळ उच्चाटन करून बालके सर्वसाधारण श्रेणीत यावीत

### आमदार प्रशांत ठाकूर यांची अधिकाऱ्यांना सूचना ■ चिखले अंगणवाडीला भेट देऊन घेतला आढावा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**
एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या प्रकल्पांतर्गत भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी चिखले येथील अंगणवाडीला गुरुवारी (दि. २९) भेट देत कुपोषणाचे समूळ उच्चाटन करून पनवेल तालुक्यातील सर्व बालके सर्वसाधारण श्रेणीत आणण्यासाठी जातीने लक्ष घालण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निर्देशानुसार तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनानुसार स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्या अंतर्गत बालकांच्या पोषणाच्या दृष्टीने पोषण माह राबविण्याच्या सूचना केंद्र शासनाने महिला व बालविकास विभागाला दिल्या होत्या. त्यानुसार १ ते ३० सप्टेंबरदरम्यान हे अभियान राबविण्यात आले. या अभियानांतर्गत आमदार प्रशांत ठाकूर यांनी चिखले अंगणवाडीला भेट दिली. या वेळी त्यांनी बालके, गरोदर व स्तनदा मातांशी संवाद साधून अंगणवाडीच्या सोयीसुविधांची पाहणी केली तसेच अंगणवाडी सेविका, पर्यवक्षिका व बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना बालकांच्या आरोग्याबाबत सजग रहावे, अशा सूचना केल्या व प्रधानमंत्री मातृवंदना योजनेचा लाभ लाभार्थ्यांना मिळतो का याचा आढावा घेतला. (पान २ वर..)

## पनवेल परिसरात जलसंवर्धन रॅली

### परेश ठाकूर यांनी सहभाग घेऊन केली जनजागृती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**
पनवेल भाजपतर्फे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस आणि राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती यानिमित्त आयोजित सेवा पंधरवड्यांतर्गत पाणी हे जीवन या विषयाला अनुसरून विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. त्यानुसार शुक्रवारी (दि. ३०) कामोठे आणि खांदा कॉलनीत जलसंवर्धन रॅली काढण्यात आली होती. या रॅलीत पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी सहभाग घेऊन जनजागृती केली. (पान २ वर..)





**पनवेल : नवीन पनवेल येथील उड्डाणपुलावर पडलेल्या खड्ड्यांमुळे या मार्गावरून प्रवास करणे वाहनचालक, प्रवाशांसाठी डोकेदुखी ठरत होते. भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली नुकत्याच करण्यात आलेल्या रास्ता रोको आंदोलनामुळे सिडकोमार्फत उड्डाणपुलावरील खड्डे भरण्याच्या कामाला शुक्रवारी सुरुवात झाली. त्यामुळे नागरिकांना दिलासा मिळाला आहे. येथील रस्त्यांचे आगामी काळात काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे.** (छाया : लक्ष्मण ठाकूर)

# सुधागड किल्ल्यावरील श्री भोराई देवी

नवरात्रोत्सव विशेष



**पाली : धम्मशील सावंत**
छत्रपती शिवरायांचा पदस्पर्श लाभलेल्या ऐतिहासिक सुधागड किल्ल्यावर विराजमान असलेली श्री भोराई देवी तालुक्यासह महाराष्ट्रातील अनेकांचे श्रद्धास्थान आहे. सध्या नवरात्र काळात हजारो भाविक देवीच्या दर्शनासाठी येत आहेत. नवरात्रोत्सवाचे यंदाचे सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे. त्यामुळे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शिवाय मंदिर व परिसरात रंगरंगोटी, रोषणाई, रांगोळी, हार व फुलांची सजावट करण्यात आली आहे.

सुधागड किल्ल्यावर प्राचीन काळातील श्री भोराई देवीचे मंदिर आहे. या देवीची स्थापना भृगू ऋषींनी केल्याचे सांगितले जाते. म्हणून या देवीला भृगू अंबा, भोरांबा, भोराई अशीही नावे आहेत. मूळ चंडीकेचे स्वरूप असणारी श्री भोराई चतुर्भुज असून तिच्या हातात त्रिशूळ, खड्ग-खेटक आणि दोन हातांमध्ये आसूड आहे. या देवीच्या पुरातन मंदिराची भोरच्या पंतसचिवांनी पुनर्बांधणी केली व याच देवीला कुलस्वामिनी मानले. पंतसचिव चिमणाजी रघुनाथ उर्फ नानासाहेबांनी पुत्रप्राप्ती झाल्यानंतर येथे १० दिवसांच्या नवरात्रोत्सवास सुरुवात झाली.

श्री भोराई देवस्थान मंडळाचे विश्वस्त गडावर नवरात्रोत्सव पूर्वापार पद्धतीने साजरा करीत आहेत. यानिमित्ताने मंदिरात सकाळी पूजा, अभिषेक, सायंकाळी आरती, रात्री कीर्तन असे कार्यक्रम होतात. अष्टमीच्या दिवशी गडकऱ्यांना मानाप्रमाणे नारळ व विडे दिले जातात, तर शिलंगणाच्या दिवशी पालखी निघते. नवरात्रोत्सव काळात हजारो भाविकांना प्रसादाचा लाभ दिला जातो. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर खबरदारी म्हणून दोन वर्षांपासून प्रसाद (जेवण) देणे बंद होते. ते आता पुन्हा सुरू करण्यात आले आहे.

देवीच्या दर्शनासाठी किल्ल्यावर येणारे भाविक आजूबाजूचा गर्द झाडीने नटलेला मनोहारी परिसर, वाहते धबधबे, नद्या, डोंगररांगा, थंड हवा यांचाही अनुभव घेत असतात. शिवाय किल्ल्यावरील विविध ऐतिहासिक वास्तूंना भेट देतात. त्यामुळे त्यांना तिहेरी आनंद मिळतो.

## दै. रामप्रहर आणि 'द्वारकादास शामकुमार'ची महिलांना सुवर्णसंधी!

आदिशक्तीचा नवत्रोत्सव सध्या सुरू असून देवीचा जागर केला जात आहे. यानिमित्ताने दै. रामप्रहर आणि द्वारकादास शामकुमार, पनवेल (महाराष्ट्राचे महावस्त्र दालन, लग्न बस्त्याचे माहेरघर) महिला वाचकांना साडी जिंकण्याची सुवर्णसंधी देत आहे. दै. रामप्रहरमध्ये प्रसिद्ध करण्यात येत असलेल्या एका प्रश्नाचे ४ ऑक्टोबर २०२२ पर्यंत अचूक उत्तर देणाऱ्या भाग्यवान महिलेला दसऱ्याच्या दिवशी साडी देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

**प्रश्नाचे अचूक उत्तर द्या आणि साडी जिंका!**



**प्रश्न : देवीच्या दहा हातांमध्ये काय काय असते?**

*या प्रश्नाचे अचूक उत्तर ७७३८१०६००९ या व्हॉट्सअॅप क्रमांकावर नाव व पत्त्यासह ४ ऑक्टोबर २०२२ पर्यंत रात्री ८ वाजेपर्यंत पाठवावे. अनेक महिलांनी बरोबर उत्तर दिल्यास लकी ड्रॉ काढून भाग्यवान विजेती महिला निवडण्यात येईल, याची नोंद घ्यावी. चला तर मग वाट कसली बघता प्रश्नाचे अचूक उत्तर पाठवा आणि साडी जिंका!*

# बुडत्या काँग्रेसला शिल्लक सेनेचा हात

## भाजप मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांची घणाघाती टीका

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या राजकारणातून अस्तित्व पुसले जाण्याच्या भीतीने उद्धव ठाकरे यांच्या पायाखालची वाळू सरकू लागली आहे. त्यामुळे बुडत्या काँग्रेसला शिल्लक सेना हात पुढे करून ठाकरे यांची सुरू असलेली तडजोड आता दोन्ही पक्षांना बुडविणार आहे, अशी टीका प्रदेश भाजपचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी शुक्रवारी (दि. ३०) केली.



शिवाजी पार्कवरच्या मेळाव्यास गर्दी जमविण्यासाठी काँग्रेसने कार्यकर्ते पुरविण्याच्या मोबदल्यात राहुल गांधींच्या भारत जोडो यात्रेसाठी महाराष्ट्रातील शिल्लक सेनेची कुमक पुरविण्याची ठाकरे यांची धडपड केविलवाणी असून आता पेंग्विन सेनेने हिंदुत्वाशी कायमची फारकत घेतल्याचे स्पष्ट झाले आहे, असा आरोपही त्यांनी केला.

दसरा मेळाव्याकरिता गर्दी जमविण्याचे आव्हान उद्धव ठाकरेंसमोर उभे असल्याने या आव्हानास सामोरे जाण्यासाठी ठाकरे यांची जोरदार धडपड सुरू आहे. अगोदर राष्ट्रवादी काँग्रेसपुढे गुडघे टेकल्याने ठाकरे यांचे नेतृत्व संपले, आता काँग्रेसच्या वळचणीस जाऊन उरलीसुरली सेना संपविण्याचा त्यांचा इरादा स्पष्ट झाला आहे. राहुल गांधींच्या भारत जोडो यात्रेचा महाराष्ट्रात फज्जा उडणार याची जाणीव असल्याने काँग्रेसने सैनिकांची कुमक देण्याच्या अटीवर ठाकरेंच्या मेळाव्यासाठी गर्दी पुरविण्याची ग्वाही दिली आहे, असा गौप्यस्फोट उपाध्ये यांनी केला. बाळासाहेबांच्या पक्षाची त्यांच्या कौटुंबिक वारसाने केलेली केविलवाणी अवस्था पाहून कीव येते. उद्धव ठाकरेंनी २०१९मध्ये जनादेशाचे पालन केले असते, तर आपल्या हाताने पक्षाच्या विसर्जनाची वेळ त्यांच्यावर आली नसती, असा टोलाही उपाध्ये यांनी लगावला.

ठाकरे गटाच्या शिवाजी पार्कवरील मेळाव्याची हवा अगोदरच निघून गेली आहे. बाळासाहेब ठाकरे यांच्या पुण्याईचा वापर करून गर्दीसमोर वल्गना करण्यापलिकडे राज्याचे नेतृत्व करण्याची ठाकरे यांची क्षमता नाही, हे त्यांनी स्वतःच अडीच वर्षांच्या सत्ताकाळात दाखवून दिले आहे. काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या कुबड्यांखेरीज पक्षाचे अस्तित्व टिकविणे शक्य नाही याची जाणीव झाल्यामुळेच या पक्षांच्या आधाराने उरलासुरला गट टिकविण्याची धडपड संपूर्ण महाराष्ट्र पाहात आहे, असेही ते म्हणाले.

# कोकणाला मिळाले चार राष्ट्रीय पर्यटन पुरस्कार

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्राला प्रथमच सर्वोकृष्ट राज्यासाठीचा सर्वकष पर्यटन विकासाचा राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाला असून पर्यटनाच्या मूलभूत सेवा सुविधांच्या श्रेणीत काम करणाऱ्या कोकणातील चार खासगी व सार्वजनिक संस्थांना राष्ट्रीय पर्यटन पुरस्कार मिळाला आहे.

दरवर्षी भारत सरकारच्या पर्यटन मंत्रालयातर्फे २७ सप्टेंबर या जागतिक पर्यटन दिनी राष्ट्रीय पर्यटन पुरस्कार प्रदान केले जातात. कोरोना काळात दोन वर्ष हे पुरस्कार दिले नव्हते. त्यामुळे सन २०१८-१९ या वर्षाकरीताचे पुरस्कार विज्ञान भवन, नवी दिल्ली येथे उपराष्ट्रपती जगदीप धानकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. या वेळी केंद्रीय पर्यटन मंत्री जी किशन रेड्डी तसेच पर्यटन सचिव अरविंद सिंह उपस्थित होते.

महाराष्ट्रातील पर्यटन विभाग महाराष्ट्र शासन सर्वोत्कृष्ट राज्याचा दुसरा क्रमांक, नागरी सुविधा (ब श्रेणी) पाचगणी नगर परिषद (सातारा), ताजमहाल पॅलेस पंचतारांकीत डिलक्स, मुंबई, वेलनेस पर्यटन आत्ममंथन वेलनेस रिसॉर्ट मुळशी (पुणे), ग्रामीण पर्यटन सगुणाबाग (नेरळ) चंदन भडसावळे, जबाबदार पर्यटन वेस्टर्न रुट्स् पुणे, गीते ट्रॅव्हल्स मनमोहन गोयल मुंबई, वाहतूक (श्रेणी-१)- ओरिक्स ऑटो इन्फ्रास्ट्रक्चर सर्व्हिसेस लि., होमस्टे दाला रुस्तर(पाचगणी) कॅप्टन विकास गोयले यांना प्राप्त झाले.

या पुरस्कारांपैकी कोकणातील तब्बल चार राष्ट्रीय पर्यटन पुरस्कार प्राप्त झाले आहेत. यातील सगुणाबाग (नेरळ) चंदन भडसावळे यांना ग्रामीण पर्यटनसाठी पुरस्कार प्राप्त झाला आहे. त्याचप्रमाणे ताजमहाल पॅलेस पंचतारांकीत डिलक्स मुंबई, ट्रॅव्हल्स कॅटेगिरीमध्ये गीते ट्रॅव्हल्स मुंबई यांना तर ट्रॅव्हल्स ट्रान्सपोर्टमध्ये ओरिक्स ऑटो इन्फ्रास्ट्रक्चर सर्व्हिसेस लि. मुंबई यांना राष्ट्रीय पर्यटन पुरस्कार प्राप्त झाले आहेत, अशी माहिती पर्यटन संचालनालय प्रादेशिक कार्यालय कोकण भवनचे उपसंचालक हनुमंत हेडे यांनी दिली.

# परस्पर निर्णय घेणाऱ्या सहसचिवांवर कारवाई

**मुंबई : प्रतिनिधी**

मंत्री व कार्यालयाची दिशाभूल करून परस्पररित्या निर्णय घेतल्याबद्दल मंत्री रविंद्र चव्हाण यांनी विभागाच्या सहसचिवाला शुक्रवारी (दि. ३०) झटका दिला आहे.

एका अधिकाऱ्याने हेतूपुरस्सर केलेल्या कृतीची गंभीर दखल घेत त्या अधिकाऱ्याची रवानगी मूळ विभागात करण्याचे आदेश मंत्री चव्हाण यांनी दिले आहेत, तसेच मंत्री कार्यालयाची जाणीवपूर्वक दिशाभूल करणाऱ्या या अधिकाऱ्याची तातडीने चौकशी करून दोषींविरुद्ध कारवाई करण्याचे आदेश त्यांनी दिले आहेत.

भंडारा, गोंदिया, गडचिरोली व चंद्रपूर या धान उत्पादक जिल्ह्यातील धानापासून तयार झालेल्या सिएमआर (तांदूळ) इतर जिल्ह्यांना उचल व वाटप करण्यासंदर्भातील आराखडा तयार करून त्यास शासनाची मान्यता घेण्याचा २०२०मधील शासन निर्णय आहे, परंतु या प्रकरणामध्ये विभागाने या विषयाबाबतच्या नस्ती (फाईल) वर मंत्री चव्हाण यांची मान्यता न घेता व यासंदर्भातील निर्णय परस्पर घेतला. एवढेच नव्हे तर २० सप्टेंबर २०२२च्या पत्रान्वये उचल व वाटप करण्यासंदर्भात सूचना दिल्या. विशेष म्हणजे हा निर्णय घेतल्यानंतर सदर नस्ती (फाईल) केवळ सोपस्कर म्हणून मंत्री चव्हाण यांच्या अवलोकनार्थ म्हणून सादर केली. मंत्री कार्यालयाची दिशाभूल करून प्रतिनियुक्तीने विभागात कार्यरत असणारे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे सहसचिव सुधीर देवदत्त तुंगार यांनी हेतूपुरस्सर कृती केल्याचे उघड झाले. त्यानंतरच ही कारवाई करण्यात आली आहे, असे मंत्री चव्हाण यांनी स्पष्ट केले.

# कोकण भवन येथे विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र वाटप

**नवी मुंबई : वार्ताहर**

ठाणे जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने मागील आठवड्यात जातवैधता प्रमाणपत्रासंबंधी कार्यशाळेचे आयोजन केले होते. यामध्ये सहभागी झालेल्या काही विद्यार्थ्यांच्या कागदपत्रात त्रुटी आढळल्या होत्या. त्या विद्यार्थ्यांसाठी पुन्हा गुरुवारी (दि. २९) कार्यशाळेचे आयोजन केले होते. यामध्ये सहभागी झालेल्या ६९ विद्यार्थ्यांना तत्काळ जातवैधता प्रमाणपत्र देण्यात आल्याची माहिती उपायुक्त वासुदेव पाटील यांनी दिली.

या कार्यशाळेस मोठ्या संख्येने अर्जदारांनी उपस्थित राहून त्रुटी पुर्तता केलेली व त्याच दिवशी अर्जदारांचा जातींचा दावा समितीने वैध केला. सध्या प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. विद्यार्थ्यांची गरज विचारात घेऊन या कार्यालयात दाखल शैक्षणिक प्रस्तावांची छाननी केली व कोकण भवन, बेलापूर, नवी मुंबई येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

# जेएनपीएला सर्वाधिक प्रशंसनीय केंद्रीय संस्थेचा पुरस्कार

**उरण : वार्ताहर**

भारतातील सर्वोत्तम कामगिरी करणारे बंदर जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण अर्थात जेएनपीए बंदरास इकॉनॉमिक टाइम्स इन्फ्रा फोकस अवॉर्ड्स २०२२मध्ये सार्वजनिक-खासगी गुंतवणुकीस अर्थात पीपीपीला (बंदरे) प्रोत्साहन देणारी सर्वाधिक प्रशंसनीय केंद्रीय संस्था म्हणून गौरविण्यात आले.

जवाहरलाल नेहरू पोर्टने जुलै १९९७मध्ये न्हावा शेवा इंटरनॅशनल कंटेनर टर्मिनल (एनएसआयसीटी)या खाजगी टर्मिनल सोबत ऐतिहासिक करार केला होता, ज्यामुळे एनएसआईसीटी हे देशातील प्रमुख बंदरांमध्ये पीपीपी तत्त्वावर विकसित केलेले पहिले पोर्ट टर्मिनल बनले. अशा प्रकारचा करार करणारे जेएनपीए हे देशातील पहिले बंदर ठरले.

जेएनपीएच्या वतीने उपाध्यक्ष उन्मेष शरद वाघ, भा.रा.से. यांनी पुरस्कार स्वीकारला. उन्मेष शरद वाघ यांनी जेएनपीएचे सर्व कर्मचारी आणि भागधारकांचे आभार मानले.



**पनवेल : डोलघर येथील जागृत देवस्थान येथे नवरात्रोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. देवीची ओटी भरण्यासाठी मोठ्या संख्येने महिलावर्ग मंदिरात येत आहेत.**

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात निबंध स्पर्धा

**खारघर : रामप्रहर वृत्त**



जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात शुक्रवारी (दि. ३०) आजीवन अध्ययन व विस्तार विभाग व भाजप, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छता अमृत महोत्सवांतर्गत निबंध लेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

विद्यार्थ्यांना जलसंवर्धनाचे महत्त्व पटावे त्याप्रमाणे स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यासाठी निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रुपेंद्र गायकवाड यांनी, विद्यार्थ्यांना जलसंवर्धनाचे महत्त्व समजावून सांगितले व त्याप्रमाणे आचरण करण्याचे आवाहन केले. निबंध स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील वेगवेगळ्या विभागातील सुमारे १३८ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला व दिलेल्या विषयांवर प्रभावीपणे लिखित स्वरूपात सादरीकरण केले.

या स्पर्धेत जीवा मुळे प्रथम, प्रीती राठोड द्वितीय, मेहुल पाटील तृतीय क्रमांक पटकाविले. स्पर्धेसाठी भाजप खारघर मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष प्रा. महेश्वरी झिरपे, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

स्पर्धेचे आयोजन आजीवन अध्ययन व विस्तार विभाग प्रमुख प्रा. महेश धायगुडे यांनी केले, तसेच प्रा. सफिना मुकादम, प्रा. प्रथमेश उदेकर, प्रा. विशाल देशमुख विद्यार्थी प्रतिनिधी वलीऊल्लाह पटेल व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. परीक्षक म्हणून डॉ. महादेव चव्हाण, प्रा. सफीना मुकादम, प्रा. विशाल देशमुख यांनी महत्त्वाची भूमिका जावली.

स्पर्धेचे आयोजन केल्याद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे या सर्वांनी आयोजकांचे कौतुक केले व पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या.

## दुखवटा

### कांतीलाल पाडवी

**पनवेल :** पनवेल महापालिकेतील जनसंपर्क विभागाचे प्रमुख कांतीलाल पाडवी (५२) यांचे हृदविकाराच्या तीव्र धक्क्याने निधन झाले. मुळचे विहिर (जि. धुळे) इथे राहणारे पाडवी यांची १९९४ साली प्रादेशिक दुय्यम सेवा निवड मंडळ कोकण प्रदेश कार्यालय-३ यांच्यामार्फत तत्कालीन पनवेल नगरपरिषेदेत लिपिक-टंकलेखकपदी निवड झाली होती. त्यानंतर महापालिका झाल्यानंतर त्यांनी जनसंपर्क विभाग, भांडार विभाग, सामान्य प्रशासन, कर वसुली, जनगणना, अभिलेख, सांख्यिकी, निवडणूक या विभागाच्या प्रमुखपदी काम केले होते. त्यांनी नगर परिषद आणि पनवेल महापालिकेत मिळून २८ वर्षे सेवा केली.




**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. cost |
|---|---|---|
| Tend-41/22-23 **7000024789** | Work of tower leg earthing of 400kV and 220kV line under jurisdiction of 400kV line maintenance sub division, Nagothane under 400kV R.S. (O&M) Dn. Nagothane | **Rs. 49.20 Lakhs** |
| Tend-42/22-23 **7000024827** | Supply of various clamp & connectors at 400kV R.S. Nagothane S/stn. under 400kV R.S. (O&M) Dn. Nagothane. | **Rs. 8.23 Lakhs** |
| Tend-37/22-23 **7000024666 Re-tender** | Replacement of control and relay panels at 220kV Uran and 220kV JNPT substation under EHV (O&M) Dn. Panvel. | **Rs. 195.15 Lakhs** |

EMD 1% of estimated cost. **Tender Fee- Rs. 500/-+ GST Submission of bids from 30.09.2022 to 06.10.2022 up to 23:59 hrs, Opening date:- 07.10.2022 @ 11:00 Hrs.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/ Contact Person:** The Executive Engineer(Adm) Tel. No. 022-27459624, Mob. No 9769006220. E-mail ID **se7200@mahatransco.in**

Sd/-
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**


## पान १ वरून

### जीवनात मोठे होण्यासाठी ध्यास, मेहनत, आत्मविश्वास, त्याग आवश्यक

'रयत'चे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३५जयंती फुले महाविद्यालयात आयोजित उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्ताने २२ सप्टेंबरपासून विविध स्पर्धा, व्याख्याने आदी उपक्रम झाले. त्यानंतर शुक्रवारी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला होता. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून 'रयत'चे सचिव प्राचार्य डॉ. व्ही. एस. शिवणकर, माजी विद्यार्थी संघटनेचे सचिव परेश ठाकूर, 'रयत'चे जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख, रायगड विभागीय निरीक्षक रोहिदास ठाकूर, महाविद्यालाचे उपप्राचार्य डॉ. आर. ए. पाटील, डॉ. एन. आर. मढवी, रजिस्ट्रार अनंता जाधव, प्राध्यापक, शिक्षकेतर सेवकवर्ग, विद्यार्थी व त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. व्ही. एस. शिवणकर म्हणाले की, महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये कर्मवीरांचे योगदान खूप मोठे असून ते खऱ्या अर्थाने शिक्षण क्षेत्रातील दूरदृष्टीचे नायक होते. त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात क्रांती केली व ज्ञानाची गंगा गोरगरीबांपर्यंत पोहचविली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांनी उपस्थितांचे स्वागत व परिचय करून महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेतला तसेच रयत ही आशिया खंडातील सर्वांत मोठी शिक्षण संस्था असून शासनाने संस्थेस क्लस्टर युनिव्हर्सिटीचा दर्जा बहाल केला आहे, असे सांगितले.

या वेळी विविध विभागांमार्फत लावण्यात आलेल्या भित्तीपत्रकांचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते झाले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रवीण गायकर, डॉ. प्रफुल्ल वशेणीकर व प्रा. शरयू नाईक यांनी केले, तर उपस्थितांचे आभार उपप्राचार्य डॉ. आर. ए. पाटील यांनी मानले.

### कुपोषणाचे समूळ उच्चाटन करून बालके सर्वसाधारण श्रेणीत यावीत

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते स्वस्थ बालक स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या बालकांचा प्रमाणपत्र, खाऊ व खेळणी देऊन सत्कार करण्यात आला. कुपोषित असलेल्या बालकांना प्रोटीन पावडरचे वाटप करण्यात आले, तर गरोदर व स्तनदा मातांना प्रोटीन पावडर, बेबी केअर किटचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमावेळी माजी जि. प.चे सदस्य तथा भाजपचे तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, युवा नेते योगेश लहाने, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष आनंद ढवळे, माजी नगरसेवक तेजस कांडपिळे, भाजप नेते अप्पा भागीत, चिखलेचे सरपंच नामदेव पाटील, उपसरपंच सुरेखा योगेश पाटील, सदस्य रमेश गडकरी, पद्मिनी गडकरी, विनायक पाटील, रवींद्र पाटील, सूर्यकांत पाटील, निकिता पाटील, जयश्री पाटील, कोन ग्रामपंचायतीचे सदस्य घनश्याम पाटील, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय भोये, बाल विकास प्रकल्प अधिकारी चेतन गायकवाड, तंटामुक्ती अध्यक्ष हिरामण पाटील, गाव कमिटी अध्यक्ष राम फडके, स्वप्नील पाटील यांच्यासह पदाधिकारी, आंगणवाडी सेविका, ग्रामस्थ उपस्थित होते.

### पनवेल परिसरात जलसंवर्धन रॅली

पनवेल भारतीय जनता पक्ष, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि सीकेटी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने सेवा पंधरवड्यानिमित्त पनवेल महापालिका क्षेत्रातील खारघर, कामोठे, कळंबोली, पनवेल शहर, नवीन पनवेल, खांदा कॉलनी आणि उलवे नोड या ठिकाणी परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानुसार कामोठे आणि खांदा कॉलनी भाजप मंडल, सुषमा पाटील विद्यालय व ज्युनिअर कॉलेज आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या वतीने शुक्रवारी जलसंवर्धन रॅली काढण्यात आली होती. या रॅलीतून जल संवर्धनाचा संदेश नागरिकांना देण्यात आला.

या रॅलीत भाजपचे कामोठे मंडल अध्यक्ष रवींद्र जोशी, माजी नगरसेवक गोपीनाथ भगत, एकनाथ गायकवाड, दिलीप पाटील, माजी नगरसेविका कुसूम म्हात्रे, युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, कामोठे शहर अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, खांदा कॉलनी अध्यक्ष अभिषेक भोपी, प्रदीप भगत, तेजस जाधव, शरद जगताप, सुरेंद्र हळदीलकर, सुमित झुंझारराव, गीता चौधरी, सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य एस. के. पाटील, लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक आणि महाविद्यालयांतील विद्यार्थी उपस्थित होते.


**जाहीर नोटीस**

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, **मौजे बोर्ले, तालुका पनवेल, जिल्हा-रायगड** येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तिच्या मालकी हक्काची मिळकत वा जमिन ही आमचे अशिलांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहिर नोटीस प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन:**
**मौजे : बोर्ले, तालुका- पनवेल, जिल्हा-रायगड**

| गांव | भोगवटादाराचे नांव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकारणी रू.पै. |
|---|---|---|---|---|
| बोर्ले | दत्तात्रेय पदू भोपी<br>गुलाब पदू भोपी | १२/१ | ०-१६-९०<br>पोट खराबा ०-०१-३०<br>एकूण क्षेत्र ०-१८-२० | ४.०० |

सदरहू जागा, जमिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, मालकी हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधितांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **०७ दिवसांच्या आत** आपल्या हक्क, हितसंबधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह **खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे.** जर वरिल मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : ३०/०९/२०२२**

**सही/-**
**ॲड. प्रल्हाद खोपकर**

गाळा नं. १३०, पहिला माळा, महानगरपालिका, शॉपिंग कॉम्प्लेक्स, पनवेल, ता. पनवेल, जि.रायगड-४१०२०६ मोबा नं. ९८१९१४४९९१



**जाहीर नोटीस**

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, **मौजे बोर्ले तालुका पनवेल, जिल्हा-रायगड** येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तिच्या मालकी हक्काची मिळकत वा जमिन आमचे अशिलांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : बोर्ले, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड**

| गांव | भोगवटादाराचे नांव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर. पॉ. ) | आकारणी रू.पै. |
|---|---|---|---|---|
| बोर्ले | पद्माबाई धर्मा तांडेल | १२६ | ०-४०-२०<br>पोट खराबा ०-१०-९०<br>एकूण क्षेत्र ०-५१-१० | ८.४४ |
| | | पैकी खरेदीखताचे क्षेत्र | ०-०४-३० | |

सदरहू जागा, जमिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षिस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, मालकी, हक्क, हितसंबध असलेल्या व्यक्तीना, इतर वारसांचा वा संबंधिताना ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत आपल्या हक्क हितसंबधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरून आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व वहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाही याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : २९/०९/२०२२**

**सही/-**
**ॲड. प्रल्हाद खोपकर**

गाळा नं. १३०, पहिला माळ, महानगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, पनवेल, ता. पनवेल, जि.रायगड-१०२०६ मोबा नं. ९८१९१४४९९१

# सुकापुरात क्षयग्रस्तांना धान्यवाटप

## सेवा पंधरवड्यानिमित्त भाजपचा उपक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिवस ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती या सेवा पंधरवड्यानिमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीने विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली सुकापूर येथे क्षयरोगाने ग्रासलेल्या नागरिकांना धान्याचे वाटप शुक्रवारी (दि. ३०) करण्यात आले. हे धान्याचे वाटप भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आले.

देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती या काळात भारतीय जनता पक्षाच्यावतीने विविध सेवाकार्य असलेल्या सेवा पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले आहे. त्याअंतर्गत मोदी सरकारने २०२५ पर्यत देशातून क्षयरोग सप्ताह करण्याचा संकल्प केला असून, क्षयरोग मुक्त भारत करण्यासाठी रुग्णांना दत्तक घेत त्यांचे उपचार व काळजी घेण्यासंदर्भात मोहीम राबविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने सुकापूर येथे क्षयरोगाने ग्रासलेल्या नागरिकांना धान्याचे वाटप करण्यात आले. या वेळी रायगड जिल्हा परिषदेचे सदस्य अमित जाधव, पनवेल पंचायत समितीचे सदस्य भुपेंद्र पाटील, भाजप युवा मोर्चा पनवेल तालुका अध्यक्ष आनंद ढवळे, सुकापूर ग्रामपंचायतीच्या सरपंच योगिता पाटील, माजी उपसरपंच आलुराम केणी, बुवाशेठ भगत, महेश पाटील, उदय म्हस्कर, ग्रामपंचायत सदस्य चेतन केणी, प्राची जाधव, संजय पाटील, डॉ. कृष्णा देसाई, डॉक्टर समीर कासेकर, डॉक्टर सेल संयोजक निक्षय मित्र, आदी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# नवरात्रोत्सवानिमित्त भाजपतर्फे नारीशक्ती सन्मान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिवस ते राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती या सेवा पंधरवड्यानिमित्त भाजपच्या वतीने विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने भाजपतर्फे नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून नारीशक्तीचा सन्मान करण्यात येत आहे. त्यानुसार कला, क्रीडा, सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक व वैद्यकीय क्षेत्रातील महिलांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

कला क्षेत्रात अतुलनीय काम केल्याबद्दल निता विकास घाटुगडे, संजिवनी म्हात्रे, वृशाली पाटील, आरती निलंबे या महिलांना गुरुवारी (दि. २९) विविध ठिकाणी शाल, पुष्पगुच्छ व सन्मानपत्र मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. निता घाटुगडे ह्या संस्कार भारती रांगोळी, पेंटिंग, क्रोशावर्क, पेपरबॅग, फ्लॉवर मेकिंग इत्यादी प्रकारच्या वस्तू बनवितात. तसेच विविध कला गुणांची पहिल्यापासून आवड असल्याने त्यांनी आपल्यातील ज्ञान दुसऱ्यापर्यंत पोहचविण्याची सवय व तेच ज्ञान २००० सालापासून त्यांनी पनवेल नगरीतील महिलांना देण्यास सुरुवात केली. संजीवनी म्हात्रे या ध्रुवी कलेक्शन अ‍ॅण्ड ब्युटी पार्लर गेली १० वर्षे चालवत आहेत. आरती निलंबे ह्या सर्व प्रकारच्या नऊवारी साडी, ऑल लेडीज वेअर, हॅन्डमेड साबण, लहान-मोठे कंदिल बनवितात. वृशाली पाटील यांनी आर्ट टिचिंग डिप्लोमा केला असून त्या गरजू मुलींना प्रशिक्षण देत आहेत. तसेच त्या ब्यूटीशिअन म्हणून गेली १५ वर्षे सेवा देत आहेत. याबद्दल या चौघींचा सन्मान करण्यात आला.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, जिल्हा सरचिटणीस अविनाश कोळी, माजी नगरसेवक अनिल भगत, भाजप महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत, शहर अध्यक्ष वर्षा नाईक, तालुका सरचिटणीस लीना पाटील, शहर सरचिटणीस सपना पाटील, माजी नगरसेविका सुशिला घरत, दर्शना भोईर, पनवेल शहर सरचिटणीस अमरिश मोकल, प्रणाली घरत आदी उपस्थित होते.











पनवेल : शिवाजीनगर येथे जरी मरी माता क्रीडा मंडळाच्या वतीने नवरात्रोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून या उत्सवाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देत देवीचे दर्शन घेतले. या वेळी वामन ठाकूर, राम ठाकूर, तूळशीदास ठाकूर, अमित कडू, पंढरीनाथ ठाकूर, एकनाथ ठाकूर, नितीन ठाकूर, पंकज ठाकूर, महेश ठाकूर, रमेश ठाकूर, सचिन ठाकूर, वैभव ठाकूर, सुजित ठाकूर, विक्रम ठाकूर, मोहन ठाकूर, अभिजित ठाकूर, साई ठाकूर आदी उपस्थित होते.

## निवडक

### पनवेलमध्ये आढळला मानवी सांगाडा

**पनवेल :** डेरवली गाव परिसरात एक मानवी सांगाडा आढळल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. डेरवली गाव परिसरातील दर्गाजवळ एक मानवी सांगाडा आढळला. त्या ठिकाणी एका बांधकाम व्यावसायिकांच्या जागेवर वाढलेले गवत काढण्याचे काम सुरू असताना तेथील उपस्थित कामगारांना हा मानवी सांगाडा आढळून आल्याने त्यांनी याबाबतची माहिती तालुका पोलिसांना दिली. त्यानुसार पोलिसांच्या पथकांनी तो मानवी सांगाडा ताब्यात घेतला आहे. याबाबत अधिक तपास तालुका पोलीस करीत आहेत.

### महिलेचा विनयभंग; एकावर गुन्हा

**पनवेल :** रिक्षाचालकाने एका महिलेचा विनयभंग केल्याचा प्रकार साईनगर पनवेल येथे घडला आहे. या प्रकरणी रिक्षाचालकाविरोधात शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३६ वर्षीय महिला या चारचाकी वाहनातून जात होत्या. या वेळी त्यांच्या विरुद्ध दिशेने येणाऱ्या रिक्षा चालकाने गाडी मागे घे, या कारणावरून त्यांच्याच शाब्दिक बाचाबाची चालू झाली. या वेळी रिक्षाचालकाने पीडित महिलेचा विनयभंग केला. तसेच शिवीगाळ केली. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### डिलिव्हरी बॉयकडून तरुणीचा विनयभंग

**पनवेल :** घरपोच खाद्यपदार्थ पोहचविणाऱ्या एका नामांकित कंपनीच्या डीलेव्हरी बॉयने खाद्यपदार्थ ग्राहकाच्या घरी दिल्यावर त्या खाद्यपदार्थाची रक्कम घेतली. त्यानंतर संबंधित घरात ही तरुणी एकटीच असल्याचा फायदा उचलत या डिलेव्हरी बॉयने चक्क तरुणीचा विनयभंग केल्याची घटना पनवेल तालुक्यातील कोन गावानजीक असलेल्या इंडीयाबुल्स या इमारतीमध्ये आहे.

# सागर ठाकूर यांचे अभीष्टचिंतन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

न्हावे ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच आणि विद्यमान सदस्य सागर कान्हाशेठ ठाकूर यांचा वाढदिवस गुरुवारी (दि. २९) मोठ्या उत्साहात साजरा झाला. त्यानिमित्त न्हावे येथे सागर ठाकूर यांच्या अभीष्टचिंतनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला भेट देत माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सागर ठाकूर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

या अभीष्टचिंतनावेळी कान्हाशेठ ठाकूर, अरुणशेठ ठाकूर, सरपंच हरेश्वर म्हात्रे, उपसरपंच प्रल्हाद पाटील, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, वसंतशेठ पाटील, सी. ल. ठाकूर, योगेश पाटील, अल्केश बैकर, राम मोकल, गोपीचंद ठाकूर, रवी पाटील, सुमित वेटा, देवेंद्र भोईर, प्रतिक भोईर, कैलास पाटील नरेश मोकल, दीपक तांडेल, तुकाराम मोकल, अनंत कडू, शंभो ठाकूर, हरेश्वर कडू, रुपेश मोकल, कल्पना ठाकूर, देवकूबाई ठाकूर, यांच्यासह मित्र परिवार आणि न्हावे खाडी ग्रामस्थ आदींनी उपस्थित राहून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.












नवीन पनवेल : शिवा कॉम्प्लेक्स येथे नव्याने लक्ष्मी व्हेज रेस्टॉरंट सुरू झाले आहे. या रेस्टॉरंटला भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत रेस्टॉरंटचे मालक संजीव शेट्टी व गीता शेट्टी यांना पुढील यशस्वी वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी नगरसेवक संतोष शेट्टी, भास्कर शेट्टी, शंकर गायकर, श्वेता शेट्टी, लक्ष्मी व्हेज रेस्टॉरंटच्या मॅनेजमेंटमधील सीताराम शेट्टी, अरुण शेट्टी, अजित शेट्टी, अश्विथ शेट्टी, रोहित शेट्टी, रक्षीत शेट्टी आदी उपस्थित होते.










## देवी दर्शन

पनवेल : भाजप महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी नवरात्रोत्सवानिमित्त विविध ठिकाणी जाऊन देवींचे दर्शन घेतले. या वेळी त्यांचे स्वागत करण्यात आले. खारकोपर येथे जय बजरंग महिला मंडळाचा हळदीकुंकू कार्यक्रम तसेच शेलघर येथील देवीचे दर्शन घेतले. या वेळी माजी नगरसेविका दर्शना भोईर, गव्हाणचे उपसरपंच विजय घरत, लीना पाटील, सपना पाटील, शिल्पा म्हात्रे, नर्मदा, अनुसया घरत, नंदा भोईर, मनिषा अनंतशेठ ठाकूर, वामशेठ म्हात्रे, भाऊ पाटील, भाऊ भोईर व उलवे महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.





पनवेल : भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी नवरात्रोत्सवानिमित्त सुकापूर येथे ठिकठिकाणी विराजमान देवींचे दर्शन घेतले. या वेळी माजी जि. प. सदस्य अमित जाधव, माजी पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, भाजप युवा मोर्चा तालुका अध्यक्ष आनंद ढवळे, सुकापूरच्या सरपंच योगिता पाटील, माजी उपसरपंच आलुराम केणी, बुवाशेठ भगत, महेश पाटील, उदय म्हस्कर, सदस्य चेतन केणी, प्राची जाधव, संजय पाटील, डॉ. कृष्णा देसाई, डॉ. समीर कासेकर, डॉक्टर सेल संयोजक निक्षय मित्र आदी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## संपादकीय

# नामधारी पक्षाध्यक्ष

तब्बल २४ वर्षांनंतर काँग्रेस पक्षाला गांधी परिवारापलिकडचा अध्यक्ष लाभणार आहे हे शुक्रवारी पूर्णत: स्पष्ट झाले. कारण काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मल्लिकार्जुन खरगे आणि शशी थरूर या दोघांव्यतिरिक्त कुणीही उमेदवारीचा अर्ज दाखल केला नाही. काँग्रेस पक्षात लोकशाही मार्गानेच अध्यक्षांची निवड होते आहे, असा त्या पक्षाच्या नेत्यांचा दावा आहे.

**गेली २४ वर्षे काँग्रेस पक्षाध्यक्ष हे पद गांधी परिवाराकडेच राहिले आहे. त्यातील राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखालील काही वर्षे सोडली तर बहुतांश काळ हे पद श्रीमती सोनिया गांधी यांच्याकडेच राहिले. १९९८ सालापासून आजतागायत श्रीमती गांधी यांनीच काँग्रेसची धुरा सांभाळली आहे. मधली २०१७ ते २०१९ ही दोन वर्षे राहुल गांधी यांनी पक्षाचे नेतृत्व केले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना टक्कर देण्याची क्षमता फक्त गांधी परिवारातील तरुण चेहऱ्यामध्येच आहे असा तेव्हा काँग्रेसजनांचा (गैर)समज झाला होता, तो किती फोल ठरला हे आपण आता पाहतोच आहोत. गेल्या आठ वर्षांत काँग्रेसची अवस्था अतिशय केविलवाणी झाली. २०१४ सालानंतरची जवळपास प्रत्येक निवडणूक काँग्रेस पक्षाने गमावली आहे. आता तर फक्त राजस्थान आणि छत्तीसगढ या दोनच राज्यांमध्ये काँग्रेसची सत्ता उरली आहे. ज्या पक्षाने स्वातंत्र्यलढ्यात भारतीय जनतेचे नेतृत्व केले, आचार्य कृपलानींपासून पंडित जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी, के. कामराज, एस. निजलिंगप्पा असे दिग्गज काँग्रेस अध्यक्ष स्वतंत्र भारताने अनुभवले आहेत, तोच पक्ष गेल्या आठ-दहा वर्षांमध्ये मात्र बघता-बघता रसातळाला गेला. गांधी परिवाराशिवाय काँग्रेस ही कल्पनाच कुठलाही काँग्रेसजन सहन करू शकत नाही. या परिवारवादाची मोठी किंमत या पक्षाला मोजावी लागली. चोवीस वर्षांनंतर यंदा प्रथमच काँग्रेसचा अध्यक्ष गांधी परिवाराबाहेरचा असणार आहे. ज्येष्ठ नेते मल्लिकार्जुन खरगे हे अनुभवी आणि बुजुर्ग राजकारणी आहेत. सर्व पक्षांमध्ये त्यांचे संबंध चांगले आहेत. खुद्द पंतप्रधान मोदी यांच्याशीदेखील खरगे यांचे संबंध सलोख्याचे आहेत. गांधी परिवाराला देखील त्यांच्याबद्दल आदर आणि विश्वास वाटतो. असे असले तरी त्यांना लोकसमर्थन मात्र म्हणावे तसे नाही. त्यांचे प्रतिस्पर्धी खासदार शशी थरूर हे बुद्धिमान, तरुण नेतृत्व मानले जाते. त्यांचे इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व, संयुक्त राष्ट्रांमधला प्रदीर्घ अनुभव यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व उठावदार वाटते. अर्थात त्यांनाही म्हणावा तितका पक्षातून पाठिंबा नाही. काँग्रेसमधील असंतुष्टांचा गट जी२३ या नावाने ओळखला जातो. त्या गटामध्ये खुद्द शशी थरूर आहेत, परंतु गटातील अन्य सदस्यांचा पाठिंबा खरगे यांच्या उमेदवारीलाच आहे. काँग्रेस पक्षाध्यक्ष पदाची ही निवडणूक दुरंगी असली तरी अटीतटीची होईल असे वाटत नाही. खरगे यांचे पारडे पुरेसे जड आहे हे कुणीही सांगेल. राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी पक्षाध्यक्ष पदाला खुंटीवर टांगून मुख्यमंत्रीपदाची खुर्ची अधिक जवळची मानली. गेहलोत यांनी पक्षाध्यक्ष पदाची सूत्रे घ्यावीत अशी गांधी परिवाराचीच इच्छा होती, परंतु गेहलोत यांनी राजस्थानात जवळपास बंडखोरी करून पक्षश्रेष्ठींना अडचणीत आणले आणि नंतर शहाजोगपणे माफी मागून निवडणुकीच्या रिंगणातून काढता पाय घेतला. ज्येष्ठ नेते दिग्विजय सिंग यांनीही ऐनवेळी माघार घेतली. अर्थात कोणीही अध्यक्ष झाले तरीही गांधी परिवाराची हाय कमांड सर्वश्रेष्ठ राहणार हे वेगळे सांगायची गरज नाही.**

# रायगडच्या पर्यटनवाढीला वाहतूक कोंडीचा ब्रेक

डोळ्यांचे पारणे फेडणारे निसर्गसौंदर्य, तब्बल २४० किमी लांबीचा विस्तीर्ण समुद्रकिनारा, माथेरानसारखे थंड हवेचे ठिकाण ऐतिहासिक, धार्मिक वारसास्थळे लाभलेला रायगड जिल्हा पर्यटनासाठी योग्य ठिकाण आहे. त्यामुळे महाराष्ट्रातीलच नव्हे तर संपूर्ण भारतातील पर्यटक, इतिहासप्रेमी, पर्यावरण अभ्यासक व भाविक जिल्ह्यात दाखल होत असतात. उन्हाळी व नाताळच्या सुट्ट्यांमध्ये तर पुणे-मुंबईसह महाराष्ट्रातील निरनिराळ्या ठिकाणच्या पर्यटक रायगड जिल्ह्यात गर्दी करतात, मात्र यातील बहुतांश पर्यटनस्थळांवरील रस्त्यांची झालेली दूरवस्था व त्यामुळे पर्यायाने होणारी वाहतूक कोंडी यामुळे पर्यटकांची मोठी गैरसोय होत आहे.

**खबरबात**
**धम्मशील सावंत**





सुट्ट्यांनिमित्त पुणे-मुंबईसह महाराष्ट्रातील निरनिराळ्या ठिकाणच्या पर्यटकांची पावले आता जिल्ह्यातील पर्यटनस्थळाकडे वळली आहेत. जिल्ह्यातील विविध समुद्रकिनारे व पर्यटनस्थळांवर गर्दी वाढली आहे. यामुळे पर्यटनावर अवलंबून असलेले हॉटेल व्यावसायिक, खानावळी, दुकानदारांची सध्या चलती आहे, मात्र असे असले तरी येथे दाखल होणारे पर्यटक, भाविक व प्रवासी खराब रस्ते आणि वाहतूक कोंडीमुळे पुरते हैराण झाले आहेत. वाहतूक कोंडीमुळे पर्यटकांना तासन्‌तास खोळंबून रहावे लागते, तसेच इच्छितस्थळी पोहचण्यास देखील उशीर होतो. राष्ट्रीय महामार्गासह राज्य व अंतर्गत मार्गांची अवस्था वाईट आहे, तसेच अनेक ठिकाणी रस्त्यांची कामे अर्धवट अवस्थेत सुरू आहेत. परिणामी येथे येणाऱ्या पर्यटकांना खाचखळगे, खड्डे, अरुंद मार्ग आणि वारंवार होणारी वाहतूक कोंडी अशा अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे याचा प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे फटका पर्यटन व्यवसायालादेखील बसत आहे. खराब रस्ते व वाहतूक कोंडी यामुळे असंख्य पर्यटकांनी जिल्ह्याकडे पाठ फिरविलेली पहायला मिळत आहे. परिणामी येथील पर्यटन व्यवसायावर संकट ओढवले आहे.

अष्टविनायकांपैकी दोन गणपती हे रायगडमध्ये आहेत. ते म्हणजे खालापूर तालुक्यातील महडचा वरदविनायक आणि सुधागड तालुक्यातील पालीचे बल्लाळेश्वराचे मंदिर. महडकडे जाणारा रस्ता खूप अरूंद आहे. त्यामुळे वाहतुकीला अडथळा येतो, तसेच पालीच्या बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी पुण्या-मुंबईवरून येताना पाली-खोपोली मार्ग व मुंबई-गोवा महामार्गदेखील खराब आहे. पालीतील अंतर्गत रस्ते खराब व अरूंद आहेत. त्यामुळे येथे प्रचंड वाहतूक कोंडी होते. परिणामी येथे येणाऱ्या भाविकांचे हाल होतात.

पनवेल, पेण, अलिबाग, खोपोली, पाली, माणगाव, महाड, श्रीवर्धन, म्हसळा, रोहा या शहरात वाहतूक कोंडी नित्याची असते. जिल्ह्यातील अलिबाग-नागाव, आक्षी, रेवस, वरसोली, मुरूड-काशिद, श्रीवर्धन-दिवेआगर, हरिहरेश्वर, आदगाव येथील समुद्रकिनारे पर्यटकांना भुरळ घालतात, मात्र येथील अंतर्गत रस्ते अरूंद आहेत. त्यामुळे मोठी वाहने तसेच दोन्ही बाजूने वाहने जातांना अडथळा निर्माण होतो. आणि परिणामी वारंवार तेथे वाहतूक कोंडी होत आहे, तसेच येथील रस्त्यांची देखील दूरवस्था झाली आहे. माणगाव-दिघी पोर्ट रस्त्याचे काम सुरू असल्याने श्रीवर्धन, आदगाव, दिवेआगर व हरिहरेश्वरच्या समुद्रकिनाऱ्यांवर जाणाऱ्या पर्यटकांची गैरसोय होते. म्हसळा आणि माणगाव शहरातील कोंडी तर नित्याचीच आहे. श्रीवर्धन, बोर्लीपंचतन, अलिबाग शहरातदेखील अरूंद रस्त्यामुळे कोंडी होते. त्यामुळे अनेक पर्यटकांचा हिरमोड होतो. माथेरानला जाणाऱ्या अरूंद व घाट रस्त्यामुळेदेखील वाहतूक कोंडी होते.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगड किल्ल्यावर पोहचण्यासाठी दोन मुख्य मार्ग आहेत. एक मुंबई-गोवा महामार्गावरून नातेखिंड मार्ग तर निजामपुरवरून गेलेला एक मार्ग. निजामपूरवरून जाणार मार्ग अतिशय अरूंद, वळणावळणाचा व धोकादायक आहे. काही ठिकाणी खराबदेखील झालेला आहे, तसेच मुंबई-गोवा महामार्गावरील सुरू असलेले काम यामुळेदेखील शिवप्रेमींना रायगडावर पोहचण्यास अडथळे येतात. याबरोबरच वडखळ, पेण, रामवाडी, इंदापूर, कोलाड व लोणेरे आदी ठिकाणी होणाऱ्या वाहतूक कोंडीलादेखील सामोरे जावे लागते.

दक्षिण कोकणातील तसेच पुण्या-मुंबईतील पर्यटकांना मुरुड जंजिरा आणि कुलाबा किल्ल्यावर जाण्यासाठी मुंबई गोवा महामार्गावरून जावे लागते. मुंबई-गोवा महामार्गाची दूरवस्था तसेच मुरुड व अलिबागमधील अंतर्गत रस्ते खराब तर आहेतच, पण अरूंददेखील आहेत. त्यामुळे येथे वाहतूक कोंडी होऊन येणाऱ्या पर्यटकांची गैरसोय होते.

ही स्थिती सुधारण्यासाठी प्रशासनाने लवकरात लवकर या सर्व रस्त्यांची चांगल्या प्रकारे देखभाल दुरूस्ती करणे आवश्यक आहे. कोणताही रस्ता बनवितांना योग्य नियोजन करून काम वेळेत पूर्ण करणे गरजेचे आहे. महामार्ग, राज्यमार्ग व अंतर्गत रस्ते रूंद करणे, रस्त्याच्या कडेची अतिक्रमणे हटविणे, आवश्यक तेथे नियमित वाहतूक पोलीस तैनात ठेवणे, बायपास मार्गांचा पर्याय देणे, आवश्यक तेथे अवजड वाहतूक बंद करणे, वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करणे आवश्यक आहे, तरच पर्यटकांचा अधिक ओघ जिल्ह्यात वाढेल आणि पर्यटन व्यवसायाला चालना मिळेल.



## बदलते तंत्रज्ञान

### व्हॉट्सअ‍ॅप, ओटीटीसाठी फेक डिटेल्स वापरताय तर सावधान!



बनावट कागदपत्रे देऊन सिम विकत घेणे किंवा खोटी ओळख देऊन व्हॉट्सअ‍ॅप, टेलिग्राम किंवा सिग्नलसारखे अ‍ॅप वापरणे तुम्हाला मोठ्या संकटात टाकू शकते. जर एखादा वापरकर्ता असे करताना पकडला गेला, तर त्याला एक वर्षापर्यंतच्या कारावासाची किंवा ५०,००० रुपयांपर्यंतचा दंड किंवा दोन्ही अशी शिक्षा होऊ शकतात. भारतीय दूरसंचार विधेयक २०२२च्या मसुद्यात या गोष्टी सांगण्यात आल्या आहेत. या विधेयकामुळे सरकार ऑनलाइन आयडेंटिटी फ्रॉड प्रकरणांना आळा घालण्याच्या तयारीत आहे.

इकॉनॉमिक टाईम्सच्या रिपोर्टनुसार, या विधेयकाबाबत डिपार्टमेंट ऑफ कम्युनिकेशनने म्हटले आहे की, 'यामुळे टेलिकॉम सेवेचा वापर करून होणाऱ्या फसवणुकीला आळा घालण्यास मदत होईल. त्यामुळेच विधेयकात आवश्यक तेथे ओळखीशी संबंधित तरतुदींमध्ये त्याचा समावेश करण्यात आला आहे. विधेयकात या गुन्ह्याचे वर्णन 'कॉग्निसेबल' असे करण्यात आले आहे. याचा अर्थ पोलीस आयडेंटिटी फ्रॉड करणाऱ्या व्यक्तीला कोणत्याही वॉरंटशिवाय अटक करू शकतात.

केंद्रीय दूरसंचार मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले की, नवीन विधेयकामुळे अनेक प्रकारचे सायबर गुन्हे थांबतील. तसेच ते असेही म्हणाले की जद्ध सेवांसाठी आधीच कठोर केवायसी नियमदेखील फसवणुकीच्या घटना कमी करण्यास मदत करतील. वैष्णव म्हणाले की, कॉल रिसीव्ह करणाऱ्या वापरकर्त्याला वेगवेगळ्या प्लॅटफॉर्मवरून कोण कॉल करत आहे हे माहित असणे महत्त्वाचे आहे. आता डेटा आणि व्हॉईस कॉलमधला फरक संपला आहे. त्यामुळे ओटीटीसह सर्व प्लॅटफॉर्म एका कायद्याखाली आणले जात आहेत.

दूरसंचार विभागाने भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरणाला (ट्राय) एक प्रणाली तयार करण्यास सांगितले आहे जेणेकरुन घधउकागदपत्रांमध्ये असलेले कॉलरचे नाव हे कॉल रिसिव्हकरणाऱ्या वापरकर्त्याच्या स्क्रीनवर दिसेल.

# माझे स्वैच्छिक रक्तदान...!

१ ऑक्टोबर राष्ट्रीय स्वैच्छिक रक्तदान दिवस. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस व महात्मा गांधी जयंतीनिमित्त संपूर्ण देशात १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरदरम्यान रक्तदान अमृत महोत्सवही साजरा करण्यात येत आहे. शासनाचे घोषवाक्य, 'रक्तदान हे एकजुटीचे कार्य आहे, या प्रयत्नात सामिल व्हा आणि जीव वाचवा' असे आहे.

**निमित्त**




स्वैच्छिक रक्तदानासाठी युवा वर्गातून भरपूर प्रतिसाद मिळत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने तसेच अमृत महोत्सवावेळी केंद्रीय आरोग्य मंत्रालय रक्तदान अभियान राबवत असून केंद्रीय आरोग्यमंत्री डॉ. मनसुख मांडविया यांनी सफदरजंग हॉस्पिटल दिल्ली येथे रक्तदान शिबिरात स्वतः रक्तदान करून स्वैच्छिक रक्तदान अमृत महोत्सव अभियानाची सुरुवात केली. विज्ञानाने आजपावतो वेगवेगळ्या क्षेत्रात प्रगती केली असली तरी मानवी रक्ताला अजूनही वैज्ञानिकांना दुसरा पर्याय सापडलेला नाही. माणसाचा जीव वाचविण्यासाठी माणसाला फक्त माणसाचेच रक्त लागते यासाठी स्वैच्छिक रक्तदान हे महत्त्वाचे ठरते. रक्ताची निर्मिती ही प्रत्येकाच्या मानवी शरीरात होते पण यासाठी रक्तदान करण्याची मानसिकता असणे गरजेचे आहे.


रक्ताचा एक एक थेंब, मानवी जीवनाचा अंकुर फुलवित असतो. महाराष्ट्र तसेच देशात जास्तीत जास्त स्वैच्छिक रक्तदान मोहीम ही रक्तदान शिबिर माध्यमातून तसेच वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस, पुण्यस्मरण, जयंतीनिमित्त अशा विविध माध्यमातून रक्तसंकलन केले जाते. रक्त हे मानवी जीवनात अत्यंत महत्त्वाचे आहे. आरोग्याच्या बहुतांश समस्या रक्ताशी निगडीत आहेत. मनुष्याच्या शरीरातील रक्ताचे प्रमाण योग्य असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. जर कोणत्याही कारणाने रक्त संक्रमणाची वेळ आली की, रक्ताची आणि पर्यायाने रक्तदात्यांची आवश्यकता भासते. तेव्हा प्रथम आपला रक्तगट कोणता आहे हे माहित असणे आवश्यक आहे. रक्तदाता हा रुग्णाचे प्राण वाचविण्याच्या दृष्टीने रुग्ण व डॉक्टर यामधील समाजातील महत्त्वाचा एक दुवा आहे.

अपघात, शस्त्रक्रिया किंवा प्रसुती वेळी रुग्णाचे प्राण वाचवण्यासाठी नेहमीच रक्ताची गरज असते. अशावेळी रक्तपेढीत रक्त उपलब्ध नसल्यास रुग्णाच्या नातेवाईकांची धावपळ होते. अशा वेळी योग्य रक्ताचा पुरवठा न झाल्यास रुग्णाचे प्राण जाऊ शकतो. यासाठी रक्तपेढीत रक्तसाठा उपलब्ध असणे गरजेचे आहे. म्हणून जास्तीत जास्त लोकांनी स्वैच्छिक रक्तदान करणे आवश्यक आहे.

रक्तदान अमृत महोत्सव अभियान राबविण्यात येणाऱ्या आरोग्य सेतू पोर्टलवर स्वैच्छिक रक्तदानासाठी रजिस्टर करून यामध्ये अनेक रक्तदात्यांनी मानवतेसाठी पंतप्रधान यांचे मिशनचा भाग बनण्यासाठी सामिल झाले आहे. नोंदणीसाठी आपण https:/e.raktkosh.in या वेबसाईटवर लाखांच्या वर रक्तदात्यांनी नोंदणी केली व रक्तदान केल्यानंतर त्यांना शासनाकडून ऑनलाइन रक्तदान प्रमाणपत्र देण्यात आले. या मोहिमेत आपणही सहभागी होऊन रक्तदानअमृत महोत्सव अभियान रक्तदान करून राष्ट्रीय कार्यात सहभागी होऊ शकता. कारण प्रत्येक रक्तदाता हा जीवन रक्षक आहे.


**-हेमकांत सोनार,**
**जिल्हा रुग्णालय रक्तकेंद्र, अलिबाग**

**क्लिक...क्लिक...!**



**पोलादपूर : प्रतापगडावर दरवर्षी नवरात्रोत्सवात मशाल महोत्सव साजरा करून भवानी मातेचा जागर केला जातो. या वेळी संपूर्ण गडावर मशाल पेटविल्या जातात. हजारोंच्या संख्येने भाविक या मशाल महोत्सवात सहभागी होतात. यंदाही हा सोहळा झाला.**

## आरोग्य प्रहर



### असा मिळवा खवखवणारा घसा, खोकल्यापासून आराम

पावसाळ्याचे दिवस संपत आले असून आता हलक्या थंडीला सुरुवात झाली आहे. हवेत गारवा निर्माण होत आहे. या हवामानातील खराब वातावरणामुळे घसा दुखणे, सर्दी, खोकला अशा काही शारीरिक आजारांचा त्रास जाणून लागतो. किरकोळ खोकला आणि घसादुखीसाठी, घरातील काही गोष्टी खाल्ल्या जाऊ शकतात. या गोष्टी घशातील हंगामी संसर्ग दूर करण्यासाठी प्रभावी आहेत.

**मिठाचे पाणी** : सुरुवातीला मिठाच्या पाण्याने घसा रिकामा करा. यासाठी घशाला गरम पाण्याचा शेक मिळेल. गरम पाण्याने गुळण्या केल्याने घशाला आराम मिळेल आणि साचलेला श्लेष्माही वितळेल. एक ग्लास कोमट पाण्यात अर्धा चमचा मीठ टाकून गार्गलिंग करता येते.

**मध** : एक ते दोन दिवस आड एक चमचा मध खा. घशाच्या संसर्गामध्ये मध खाणे फायदेशीर आहे. कारण ते अँटी-बॅक्टेरियल गुणधर्मांनी समृद्ध आहे आणि जखमेच्या उपचारांच्या औषधाचा प्रभाव दर्शवते. कोमट पाण्यात मध मिसळून दिवसातून दोन ते तीन वेळा प्यावे. एक वर्षापेक्षा लहान मुलाला मध देऊ नका.

**मेथी** : घशातील जंतुसंसर्ग आणि सूज दूर करण्यासाठी मेथीचे दाणे पाण्यात उकळून गाळून प्यावे. मेथीमध्ये वेदना कमी करणारे गुणधर्म आणि बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारा पदार्थाचे गुणधर्म असतात. ज्यामुळे जळजळ आणि संसर्गाचा प्रसार कमी होतो.

**हळद** : एक कप गरम पाण्यात अर्धा चमचा हळद आणि अर्धा चमचा मीठ टाकून गार्गल करा. हळदीतील औषधी गुणधर्म घसा खवखवणे आणि सूज दूर करण्यासाठी उपयुक्त आहेत. यामध्ये आढळणारे शक्तिशाली अँटी-ऑक्सिडंट घशाचे संक्रमण वेगाने कमी करतात.

**चहा** : असे अनेक चहा दुधाशिवाय बनवता येतात जे घशाला आराम देतात. आल्याचा चहा, दालचिनी चहा किंवा लवंग चहा घशाच्या संसर्गावर सर्वात प्रभावी आहे. याशिवाय कॅमोमाइल टी, ग्रीन टी आणि पेपरमिंट टीही पिऊ शकता.

# माथेरानच्या समस्या सोडविणार

## पालकमंत्री उदय सामंत यांचे भाजप शिष्टमंडळाला आश्वासन



**कर्जत : बातमीदार**

माथेरानमधील समस्या सोडविण्यासाठी शिवसेना भाजप युतीचे सरकार कटिबद्ध असून, युती सरकारच्या काळात अधिकाधिक कामे करण्यात येतील, अशी ग्वाही रायगड जिल्हा पालकमंत्री उदय सामंत यांनी भारतीय जनता पक्षाच्या शिष्टमंडळाला दिली.

पर्यटनस्थळ असलेल्या माथेरानेमधील विकासकामांच्या संदर्भात भाजपच्या शिष्टमंडळाने जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार रवीशेठ पाटील यांच्या समवेत पालकमंत्री उदय सामंत यांची भेट घेतली. या वेळी झालेल्या चर्चेत ना. सामंत यांनी माथेरानमधील नागरी समस्या सोडविण्याचे आश्वासन दिले.

शिष्टमंडळात भाजपचे कर्जत तालुका अध्यक्ष मंगेश म्हसकर, माथेरान शहर उपाध्यक्ष किरण चौधरी, शहर सरचिटणीस राजेश चौधरी, युवक कार्यकर्ते किरण ठाकरे, पंचायत समितीचे माजी सदस्य नरेश मसणे, माजी उपनगराध्यक्ष आकाश चौधरी, माजी नगरसेवक चंद्रकांत जाधव, संदीप कदम, प्रदीप घावरे, राकेश चौधरी यांचा समावेश होता. या शिष्टमंडळाने माथेरानमधील झोपडपट्टी अधिकृत करण्याबाबत पालकमंत्र्यांना निवेदन दिले. तसेच पनवेल-धोदाणी मार्गे माथेरान या पर्यायी रस्त्याला मान्यता मिळावी, अशा काही मागण्या केल्या.

या शिष्टमंडळाने राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांचीही भेट घेतली. त्यावेळी माथेरानसाठी पर्यायी रस्त्याची मागणी आणि मंजुरीच्या प्रतीक्षेत असलेला रोप-वे प्रकल्प पूर्ण करण्याची मागणी केली.

सर्व खात्यांच्या अधिकाऱ्यांबरोबर बैठक आयोजित करून माथेरानच्या सर्व समस्या मार्गी लावू, असे आश्वासन ना. चव्हाण यांनी या वेळी दिले.

# खालापूरजवळ एनएमटी बस कठड्यावर आदळली

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे महामार्गावर खालापूर तालुक्यातील विणेगाव बापदेव मंदिरासमोर शुक्रवारी (दि. ३०) सकाळी एनएमएमटी बसचा अपघात झाला. या वेळी बसमध्ये ५९ प्रवासी होते. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवित हानी झालेली नाही.

एनएमएमटी बस (एमएच-४६,बी-८१७०) शुक्रवारी सकाळी खोपोलीहून-सीबीडी येथे जात होती. विणेगाव बापदेव मंदिरासमोर पुढे असलेल्या टेम्पोने अचानक ब्रेक लावला. त्यामुळे पाठीमागून येणाऱ्या एनएमएमटी बसचा चालक कमलेश मिश्रा याने बस थांबविण्याचा प्रयत्न केला. मात्र टेम्पोला धडक बसणार ही बाब लक्षात येताच चालक मिश्रा याने प्रसंगावधान राखत रस्त्यामधोमध असणाऱ्या सिमेंटकाँक्रीटच्या कठड्यावर बस चढविली. या अपघातामुळे महामार्गावर अर्धा तास वाहतूक कोंडी झाली होती.

दुसऱ्या घटनेत मावळ पुणे येथून कोंबड्यांची वाहतूक करणारा टेम्पो जुन्या महामार्गावरून मुंबई जात असताना शुक्रवारी (दि. ३०) पहाटे शिंग्रोबा मंदिर परिसरात चालकाचा गाडीवरील ताबा सुटला. आणि टेम्पो महामार्गावरच पलटी झाला. या अपघातात चालक सुदैवाने बचावला असला तरी टेम्पोमधील दोन हजार कोंबड्या मृत्यूमुखी पडल्या.





# जिल्हा नियोजन मंडळाचा ४० टक्के निधी मुरूड तालुक्याला देणार -आमदार महेंद्र दळवी

## भंडारी बोर्डिंगच्या सभागृह कामाचे भूमिपूजन





**मुरुड : प्रतिनिधी**

जिल्हा नियोजन मंडळावर आता आमदारांचेच वर्चस्व असल्याने आगामी काळात मुरूड तालुक्याच्या विकासासाठी किमान ४० टक्के निधी मिळवून देणार असून, सर्व विकासकामे पूर्ण करण्याचा आपला मानस असल्याचे आमदार महेंद्र दळवी यांनी मुरूड येथे व्यक्त केला.

मुरूड शहरातील भंडारी बोर्डिंगच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहाचे बांधकाम करण्यासाठी स्थानिक आमदार महेंद्र दळवी यांच्या प्रयत्नाने वैशिष्ठ्यपूर्ण अनुदानातून ५० लाख रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. या सभागृहाचे भूमिपूजन आमदार दळवी यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

भंडारी समाजाने निवडणुकीच्या वेळी मला जाहीर पाठिंबा दिला होता. आज या कामाची वचनपूर्ती होत आहे. हे सभागृह बांधणीसाठी निधी कमी पडला तर माझा आमदार निधीसुद्धा देईन, असे आमदार दळवी यांनी सांगितले. भंडारी बोर्डिंगचे अध्यक्ष श्रीकांत सुर्वे यांनी प्रास्ताविक केले नगर परिषदेचे प्रशासक पंकज भुसे मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रभात नाईक व उषा खोत यांनी केले. मुरूडच्या माजी नगराध्यक्ष स्नेहा पाटील, भंडारी बोर्डिंगचे मुख्य विश्वस्त निशिकांत खोत, शिवसेना (शिंदे गट) तालुका अध्यक्ष ऋषिकांत डोंगरीकर, शहर अध्यक्ष संदीप पाटील, माजी नगराध्यक्ष अशोक धुमाळ, तसेच भरत बेलोस, दिनेश मिणमिने, शंकर खेडेकर, प्रफुल्ल मोरे, नाना घुमकर, अमोल लाड, अशोक पाटील, राजन पुलेकर, मोहन करणंदेकर, रवी कासेकर, ॲड. रुपेश पाटील, आशिष पालशेतकर, जागन पुलेकर यांच्यासह तालुक्यातील भंडारी समाजबांधव या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अरविंद पाटील यांनी आभार मानले.

# पेणमध्ये सदनिकाधारकांची फसवणूक बिल्डरविरोधात गुन्हा दाखल

**पेण : प्रतिनिधी**

बोरगावर रोडवरील गुरुदत्त रेसिडेन्सी या इमारतीचे बांधकाम सुरु असून, त्यामध्ये पैसे आदा करुनही सदनिकांचा वेळेत ताबा न दिल्याने ग्राहकांनी बिल्डरविरोधात पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

पेण बोरगांव रोडलगत गुरूदत्त रेसिडेन्सी या नावाने बांधकाम चालू असलेल्या ठिकाणी मुकेश सकला व गुरुमितकौर सकला (रा. गांधीनगर, बांद्रा-मुंबई) यांनी आर्कीटेक्टकडून गुरूदत्त एम्पायर या नावाच्या इमारतीचे आरेखन प्लॅन तयार करून घेतला व तो दाखवून पहिल्या १० ग्राहकांना कमी दरात प्लॅट देतो असे आमिष दाखवून फिर्यादी राजेश तांडेल (रा. कासू, ता. पेण) यांच्याकडून वन बीएचके (रूम नं. ३०९) याकरिता नऊ लाख रूपये स्वीकारले तसेच इतर आठ ग्राहकांकडूनही वन बीएचके व टु बीएचके फ्लॅटसाठी ७७ लाख ५५ हजार असे एकूण ८६ लाख ५० हजार रुपये रोखीने व चेकने स्वीकारून त्याबाबत पावत्या दिल्या. मात्र त्याने सांगितल्याप्रमाणे मुदतीत बिल्डींगचे काम पुर्ण केले नाही तसेच बिल्डर मुकेश सकला व गुरुमितकौर सकला यांना फोन करून चर्चा करण्यासाठी बोलविले असता ते येण्याची टाळाटाळ करीत होते.

या प्रकरणी राजेश तांडेल यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन मुकेश सकला व गुरुमितकौर सकला यांच्यावर पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून अधिक तपास सुरू आहे.

# नवरात्रोत्सवात मर्यादा राखून ध्वनीक्षेपकास परवानगी

**अलिबाग : जिमाका**

रायगड जिल्हा कार्यक्षेत्रात २०२२ या वर्षाच्या कालावधीत ध्वनी प्रदूषण (नियम व नियंत्रण) नियम, २०१७ च्या नियम ५ उपनियम ३ नुसार ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक यांचा वापर श्रोतृगृहे, सभागृहे, सामूहीक सभागृहे आणि मेजवानी कक्ष यासारख्या बंद जागाखेरीज इतर ठिकाणी ध्वनीची विहीत मर्यादा राखून सकाळी ६ वाजल्यापासून ते रात्री १२ वाजेपर्यत जिल्ह्यात १५ दिवस निश्चित करण्यात आलेले आहेत.

अधिसूचनेद्वारे नवरात्र उत्सवाच्या कालावधीत पंचमी, अष्टमी व नवमी असे एकूण तीन दिवस सकाळी ६ वाजल्यापासून ते रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनीची विहीत मर्यादा राखून ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक यांचा वापर करण्यास परवानगी देण्यात आली आहे. तसेच १ ऑक्टोबर २०२२ या दिवशी नवरात्रोत्सवासाठी सकाळी ६ वाजल्यापासून ते रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक वापराबाबत निर्देश दिलेले आहेत.

नवरात्रोत्सवाच्या कालावधीत ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक यांचा वापर करण्यास देण्यात आलेल्या सूटमध्ये बदल करणे आवश्यक असल्याने जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी रायगड डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी त्यांना प्राप्त अधिकारातून पूर्वीच्या अधिसूचनेत अंशत: बदल करून नवरात्री उत्सव ३ दिवस (पंचमी, अष्टमी व नवमी) ऐवजी नवरात्री उत्सव (दि.१ ऑक्टोबर २०२२, अष्टमी व नवमी) या दिवशी ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम २०१७ च्या नियम ५, उपनियम ३ नुसार श्रोतृगृहे, सभागृहे, सामूहिक सभागृह आणि मेजवानी कक्ष यासारख्या बंद जागांखेरीज इतर ठिकाणी ध्वनीची विहित मर्यादा राखून सकाळी ६ वाजल्यापासून ते रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक यांचा वापर करण्यास परवानगी दिली आहे.

# आदर्श पतसंस्थेचे रौप्य महोत्सवी वर्षात पदार्पण

## भविष्यात फेसलेस बँकिंग प्रणालीचा अवलंब करणार




**अलिबाग : प्रतिनिधी**

आदर्श नागरी सहाकारी पतसंस्था शनिवारी (दि. १) रौप्यमहोत्सवी वर्षात पदार्पण करत आहे. या निमित्ताने आदर्शच्या कर्मचाऱ्यांना भरघोस वेतनवाढ करण्यात आली आहे. कर्मचाऱ्यांना पाच लाख रूपयांची कुटुंबासह मेडिक्लेम पॉलिसी व पोष्टाची १० लाखाची अपघात विमा पॉलिसीची भेट देण्यात येत आहे. आदर्शमध्ये भविष्यात फेस लेस बँकिंग प्रणालीचा अवलंब करण्यात येणार असून घरबसल्या व्यवहार करता येतील अशा सुविधा देण्यात येतील. आदर्शचे व्यवहार पेपरलेस करण्याचा आमचा प्रयत्न आहे, अशी माहिती आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष सुरेश पाटील यांनी दिली.

आदर्श नागरी सहकारी पतसंस्था रौप्यमहोत्सवी वर्षात पदार्पण करत आहे. त्याची माहिती देण्यासाठी अलिबाग येथील आदर्श भुवन येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत सुरेश पाटील बोलत होते. यावेळी पतसंस्थचे उपाध्यक्ष सतीश प्रधान, संचालक अनंत म्हात्रे, विजय पटेल, विलाप सरतांडेल, जगदीश पाटील, अभिजीत पाटील, संचालिका ॲड. वर्षा शेठ, ॲड. रेश्मा पाटील, सीईओ मीनाक्षी पाटील हे उपस्थित होते.

रौप्य महोत्सवी वर्ष धुमधडाक्यात साजरे करण्यात येणार आहे. या वर्षात सभासदांसाठी सांस्कृतिक, सामाजिक, क्रीडा, शैक्षणिक, आरोग्य तपासणी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. हे कार्यक्रम केवळ मुख्यालयाचे ठिकाण असलेल्या अलिबागमध्येच साजरे न करता संस्थेच्या सर्व शाखांमध्ये आयोजित करण्यात येणार आहेत, अशी माहिती सुरेश पाटील यांनी दिली.

१ ऑक्टोबर १९९८ रोजी भाड्याच्या जागेत आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेची स्थापना करण्यात आली होती. पहिल्या वर्षी संस्थेचे भागभांडवल ३० हजार रुपये होते तर २५ लाख रुपयांच्या ठेवी होत्या. सध्या आदर्शमध्ये २६५ कोटी रुपयांच्या ठेवी आहेत व १८५ कोटींचे कर्ज आहे. संस्थेचा एकत्रित व्यवसाय ४५० कोटी रुपयांचा आहे. पुढील पाच वर्षात आदर्शचा एकत्रित व्यवसाय एक हजार कोटी रुपयांपर्यंत नेण्याचे उद्दीष्ट आम्ही ठरवले आहे. आदर्श पतसंस्थेने जास्तीत जास्त डिजिटल प्रणालीचा अवलंब केला असून भविष्यात फेस लेस बँकिंग प्रणालीचा अवलंब करणार असल्याचे, त्यांनी सांगितले.

अलिबागमध्ये संस्थेच्या मालकीची चार मजली मुख्यालयाची इमारत आहे. अलिबाग, चेंढरे, रेवदंडा या शाखा स्वमालकीच्या जागेत आहेत. नागाव, मुरुड, रेवस, पोयनाड, चोंढी, पिंपळभाट, श्रीबाग, कुरुळ, बामणगाव, रामराज, नागोठणे येथे शाखा कार्यान्वित आहेत. रायगड, ठाणे, मुंबई, पुणे, रत्नागिरी, सिंधुदूर्ग अशा सहा जिल्ह्यामध्ये संस्थेचे कार्यक्षेत्र आहे, अशी माहिती सुरेश पाटील यांनी या वेळी दिली.

सन २०१८ मध्ये संस्थेने कर्मचाऱ्यांना सरासरी ३३ टक्के वेतनवाढ केली होती. त्यानंतर कोरोनाचे संकट येऊन गेले, तरीदेखील संस्थेने चार वर्षात पुन्हा कर्मचाऱ्यांसाठी वेतनवाढ जाहीर केली आहे. रौप्यमहोत्सवी वर्षात कर्मचाऱ्यांना सरासरी ३० टक्के वेतनवाढ करण्यात येणार आहे. १ ऑक्टोबर २०२२ पासून ही वेतनवाढ लागू होईल. संस्थेचे कर्मचारी व त्यांच्या कुटूंबासाठी पाच लाख रुपयांची मेडिक्लेम पॉलिसी तसेच प्रत्येक कर्मचाऱ्याची १० लाखाची अपघात विमा पॉलिसी काढण्यात आली आहे, असे अध्यक्ष सुरेश पाटील यांनी या वेळी सांगितले.

# प्रतापगडावर मशाल महोत्सव

## आमदार गोगावले यांनी घेतले भवानीमातेचे दर्शन

**पोलादपूर : प्रतिनिधी**

प्रतापगडावर दरवर्षी ललिता पंचमीच्या पूर्वसंध्येला मशाल महोत्सव साजरा करण्यात येतो. गुरुवारी (दि. २९) सायंकाळी आमदार गोगावले यांच्या हस्ते मशाल प्रज्वलित करून या महोत्सवाचा शुभारंभ करण्यात आला. या मशाल महोत्सवात हजारो शिवप्रेमी व भाविक सहभागी झाले होते. या वेळी आमदार गोगावले यांच्या हस्ते भवानी मातेची महाआरती करण्यात आली.

आमदार भरत गोगावले यांनी गुरूवारी दिवसभरात सातारा जिल्ह्यातील मांढरदेवी काळूबाई, पार येथील श्रीरामवरदायिनी या देवतांचे दर्शन घेतले. या वेळी चंद्रकांत कळंबे, निलेश अहिरे, प्रकाश कदम, राजेश डांगे, श्रीराम डांगे, आप्पा उतेकर, सिद्धेश शेठ आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.





# कर्जत नगर परिषदेचा स्वच्छ सर्वेक्षणात पुन्हा ठसा

**कर्जत : प्रतिनिधी, बातमीदार**

स्वच्छ सर्वेक्षण २०२१-२२मध्येही कर्जत नगर परिषदेने चमकदार कामगिरी केली असून स्वच्छता अभियानाच्या विजेत्यांमध्ये समावेश झाला आहे. नवी दिल्लीत राष्ट्रपतींच्या हस्ते होणाऱ्या बक्षीस वितरण समारंभाचे आमंत्रण नगर परिषदेस प्राप्त झाले आहे.

इंडियन स्वच्छता अभियानाची केंद्र शासनाने दखल घेतली असून, या स्पर्धेमध्ये बक्षीस निश्चित झाले असून कितवा क्रमांक मिळणार? याविषयी कर्जतवासीयांना उत्सुकता निर्माण झाली आहे.



कर्जत नगर परिषदेने स्वच्छ सर्वेक्षण अभियानामध्ये मागील वर्षभरात परिश्रम घेतले होते. लोकसहभाग वाढवून नाविन्यपूर्ण संकल्पना प्रत्यक्षात अमलात आणल्या होत्या. शहराच्या मध्यवर्ती ठिकाणच्या चौकात भिंती तयार करून त्यावर चित्रे काढून स्वच्छतेची जनजागृती केली, तसेच चौकामध्ये कोपरा गार्डन तयार केल्या आहेत. त्याठिकाणी स्टॅचू उभारले आहेत. या कामगिरीची दखल केंद्र शासनाने घेतली आहे.


## आवश्यकता आहे - शिक्षिका

**पिपल्स अँड परेंट्स असोशिएशन संचालित, मायनॉरिटी इंग्लिश स्कूल पनवेल.**

**१). शिक्षिका - B.Sc, B.ED.**

**२). शिक्षिका - B.A, B. ED, D.ED**

**३). CLERK - B.Com, B.A, Computer, Marathi Typing.**

**४). B.Com, B.A, Computer (For Computer Teacher)**

फक्त महिला संपर्क करू शकतात. तसेच अनुभवास प्राधान्य.

वरील अर्हताधारण केलेल्या उमेदवारांनी लवकरात लवकर खालील पत्त्यांवर अर्ज करावा.

**पत्ता :-** पनवेल महानगर पालिका जवळ प्लॉट नं ४५, मायनॉरिटी इंग्लिश स्कूल पनवेल.

**संपर्क :- ९९६७८६७९८०, ९८२०९०८००७**

**सही/-**
**मुख्याध्यापिका**
**मायनॉरिटी इंग्लिश स्कूल**
**पनवेल, रायगड.**



## जाहिर नोटीस

माझे आशिल **मे. नेक्सस इन्फ्रा भागीदारी संस्थेतर्फे भागीदार- १) श्री. प्रतापसिंह रविंद्र देशमुख २) श्री. निलेश हरजी भाटेसरा** राहणार प्लॉट नं.१०, ११, प्रतिक जेम्स, पर्ल ६०३, सेक्टर नं.३५, कामोठे नवी मुंबई यांचे सांगण्यावरुन त्यांचे वतीने **दिनांक ३ मार्च २०२२ रोजीच्या दैनिक ''किल्ले रायगड'', दैनिक ''वादळवारा'', दैनिक ''रामप्रहर''** या वर्तमानपत्रामध्ये मुळ जमिन मालक / भुखंडधारक - श्री. हरी शंकर मेहेर व इतर यांच्या मालकीच्या **मौजे : पुष्पकनगर नोड (दापोली), ता. पनवेल, जि.रायगड येथील भुखंड नं. १०१, सेक्टर नं. ८, क्षेत्र ४४५० चौ.मी.** या भुखंडाबाबत मुळ भुखंडधारक श्री. हरी शंकर मेहेर व इतर यांनी माझे आशिलांसोबत करार केलेला असल्याने सदर वर नमुद भुखंडाबाबत कोणीही तिऱ्हाईताने व्यवहार करु नये अश्या आशयाची खबरदारीची / सावधान नोटीस / हरकत नोटीस प्रसिद्ध केलेली होती.

परंतु दरम्यानच्या काळात माझे आशिलांची मुळ भुखंडधारक - श्री. हरी शंकर मेहेर व इतर यांनी ना हरकत घेतलेली असल्यामुळे माझे आशिलांची यापुढे वर नमुद भुखंडाबाबत तसेच मुळ भुखंडधारक यांच्या विरुद्ध कोणतीही हरकत राहीलेली नाही. सबब माझे आशिल **मे. नेक्सस इन्फ्रा भागीदीरी संस्थेतर्फे भागीदार - १) श्री.प्रतापसिंह रविंद्र देशमुख २) श्री. निलेश हरजी भाटेसरा यांनी मौजे: पुष्पकनगर नोड (दापोली), ता. पनवेल, जि.रायगड येथील भुखंड नं. १०१, सेक्टर नं. ८, क्षेत्र ४४५० चौ.मी. या भुखंडाबाबत दिनांक ३ मार्च २०२२ रोजीच्या दैनिक ''किल्ले रायगड'', दैनिक ''वादळवारा'', दैनिक ''रामप्रहर''** या वर्तमानपत्रामध्ये प्रसिद्ध केलेली खबरदारीची नोटीस / हरकत नोटीस माझे अशिल बिनशर्त मागे घेत आहेत.

तरी तमाम जनतेने याची नोंद घ्यावी.

ठिकाण- पनवेल
दिनांक - ०१/१०/२०२२

**सही/-**
**ॲड.जे.डी.पाटील**
**(बी.एस.एल.,एलएल.बी.)**
मुणोत रेसीडेन्सी, शॉप नं.७ व ८ एच.ओ. सी.कॉलनी समोर, जुना ठाणा नाका रोड, पनवेल, ता.पनवेल,जि.रायगड ४१०२०६.

# ‘सीकेटी’तर्फे जलसंवर्धन जनजागृती

## विविध उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांनी राबविली मोहीम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालय, शैक्षणिक संकुल यांच्या संयुक्त विद्यमाने जल ही जीवन - जल संवर्धन काळाची गरज या विषयावर निबंध लेखन स्पर्धा आयोजित केली होती. याच उपक्रमांतर्गत सीकेटी विद्यालय आणि ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी प्रभात फेरी काढून नवीन पनवेल परिसरातील जनतेला जल-संवर्धनासाठी जागृत केले.




जलसंवर्धन ही काळाची गरज असून भविष्यात पाणी समस्या ही गंभीर रूप धारण करू शकते. म्हणूनच पाण्याचा प्रत्येक थेंब हा अनमोल आहे. पाणी वाचवणे हे आपले आद्य कर्तव्य आहे ही जाणीव विद्यार्थ्यांच्या माध्यमातून समाजाला करून देण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. जल-संवर्धनासाठी विद्यार्थ्यांनी काढलेली प्रभात फेरी ‘जल है तो कल है’ निर्बंध पाळा - पाण्याचा अपव्यय टाळा’ या सारख्या घोषणा देऊन मोठ्या उत्साहात झाली. केंद्र सरकारच्या जल ही जीवन मोहिम तथा महात्मा गांधी जयंती एवं सेवा पंधरवड्याच्या औचित्याने या स्पर्धेचे आणि रॅलीचे आयोजन प्रत्येक विद्यालयाने करावे असे आवाहन पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर आणि पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत सीकेटी शैक्षणिक संकुलाने या उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला.

सीकेटी इंग्रजी माध्यमाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, मराठी माध्यमाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, ज्युनिअर कॉलेजचे पर्यवेक्षक अजित सोनावणे, प्रशांत मोरे तसेच शिक्षक यांनी उपक्रमाचे उत्कृष्ट आयोजन केले. २०० विद्यार्थी आणि भाजपचे कार्यकर्ते यांनी प्रभात फेरीत उत्साहाने सहभाग घेतला.

माजी नगरसेवक अ‍ॅड. मनोज भुजबळ, प्रकाश बिनेदार, माजी नगरसेविका सुशीला घरत, अ‍ॅड. वृषाली वाघमारे तसेच भाजप पदाधिकारी जगदीश घरत, शैलेश पाटील, सुधाकर थवई, प्रशांत फुलपगारे, शशी भगत आदींनी प्रभातफेरीमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेत विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले.

# ग्रंथालय अर्थसहाय्य योजनेबाबत आवाहन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

भारत सरकारच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता यांच्या सन २०२२-२३ या वर्षाकरिता समान निधी व असमान निधी योजनांचा लाभ घेण्यासाठी सार्वजनिक ग्रंथालयांना २८ ऑक्टोबर २०२२ पर्यंत विहित नमुन्यात प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन ग्रंथालय संचालनालय मुंबई विभाग कोंकण भवन यांनी केले आहे.

शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयाच्या सर्वांगिण विकासासाठी अर्थसहाय्याच्या विविध योजना ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यामार्फत राबविण्यात येतात. सदर समान व असमान निधी योजनांचा लाभ घेण्यासाठी विहित नमुन्यात प्रस्ताव करणे आवश्यक असते. सन २०२२-२३ साठी राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. त्या संदर्भातील नियम, अटी व अर्जाचा नमुना www.rrrlf.gov.in या प्रतिष्ठानच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. इच्छुकांनी अर्जाचा नमुना या संकेतस्थळावरून उपलब्ध करून घ्यावा. सन २०२२-२३ साठीच्या समान निधी योजना पुढीलप्रमाणे आहेत.(Matching Schemes) इमारत बांधकाम व विस्तार अर्थसहाय्य योजना. या योजने व्यतिरिक्त समान निधी योजनेंतर्गत इतर योजनांचा लाभ केंद्रीय पद्धतीने देण्यात येत असल्यामुळे इतर योजनेसाठीचे प्रस्ताव सादर करू नयेत.

या योजनेचा जास्तीत जास्त सार्वजनिक ग्रंथालयांनी लाभ घ्यावा, असे आवाहन ग्रंथालय संचालनालय मुंबईच्या ग्रंथालय संचालक शालिनी इंगोले यांनी केले आहे.

# ‘इनरव्हील’तर्फे आरोग्य तपासणी शिबिर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

इनरव्हील क्लब ऑफ पनवेलतर्फे शांतीवन नेरे येथे मेडिकल चेकअप कॅम्प बुधवारी (दि. २८) घेण्यात आला. रामकृष्ण निकेतन वृद्धाश्रम शांतीवन नेरे येथील वृद्धांच्या त्वचारोग, अस्थीरोग, स्त्रीरोग व हिमोग्लोबीन, सर्वसाधारण, नेत्र, दंत अशा विविध तपासण्या करण्यात आल्या.

या सर्व तपासण्या डॉ. आनंद, डॉ. श्रेया, डॉ. जुईली म्हात्रे डॉ. प्रशांत यादव, डॉ. शोभना पालेकर, डॉ. अर्चना मेश्राम, लक्ष्मी आय चॅरिटेबल टस्टतर्फे डॉ. जितेंद्र, तसेच डॉ. अंकिता लोखंडे, डॉ. श्रध्दा ससाणे, डॉ. अमृता नाईक, डॉ. सुषमा ससाने आदींनी केल्या. नेत्र तपासणीसाठी लक्ष्मी आय हॉस्पिटलचा स्टाफ आणि जयंती हळदीपुरकरसुद्धा उपस्थित होत्या.

या कॅम्पचे उद्घाटन क्लबच्या चार्टर सेक्रेटरी शैला खाडिलकर, अ‍ॅड. सुजाता चव्हाण, लेखिका सुनीता जोशी, शांतीवनचे डॉ. गोगटे, अध्यक्ष संजीवनी मालवणकर यांच्या हस्ते झाले. शांतीवन येथे कुष्ठरुग्णांसाठी व वृद्ध महिलांना साड्या वाटप करण्यात आल्या. या वेळी क्लबचे सदस्य उपस्थित होते.



**खारघर : सेक्टर ४ बेलपाडा येथील कै. दि. बा. पाटील ज्येष्ठ नागरिक उद्यानात वाढलेल्या गवताची छाटणी करण्यात आली. या कामी भाजप नेते प्रभाकर घरत यांनी पाठपुरावा केला होता. त्यानुसार पनवेल महापालिकेच्या माध्यमातून या उद्यानातील वाढलेले गवत कापण्यात आले. या वेळी प्रभाकर घरत यांच्यासह सुपरवायझर संदीप भोईर उपस्थित होते.**

# रसायनीत फिट ऑन स्ट्रीट उपक्रम

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय)च्या शाखा प्रबंधक अस्मिता चव्हाण आणि रिलेशनशिप मॅनेजर निमिष कुमार झा (पेण विभाग) यांनी पाताळगंगा परिसरातील उद्योजकांना आणि दुकान धारकांसमवेत फिट ऑन स्ट्रीट उपक्रम राबविला. यामध्ये उद्योजकांना आणि दुकान धारकांना भेट देऊन आर्थिक समावेशन बद्दल जागरूकता निर्माण केली.



या वेळी स्टेट बँकेच्या विविध सुविधांबाबत उद्योजकांना व दुकानदारांना माहिती सांगण्यात आली. छोट्या उद्योगांसाठी करंट अकाऊंट सुविधा उपलब्ध आहे. ह्या खात्यासोबत मोफत क्यु आर स्कॅनर कोड, मोफत स्टेटमेंट, इंटरनेट बँकिंग सुविधा, चेकबुक इत्यादी सुविधा उपलब्ध आहेत. तसेच अधिकाधिक लोकांना ह्या सुविधेचा लाभ घेता यावा म्हणून करंट अकाऊंटसाठीच्या मिनीमम बॅलेंसमध्ये ही घट करण्यात आली आहे.

ग्राहक सेवेसाठी स्टेट बँक ऑफ इंडियाची रसायनी शाखा कायम तत्पर आणि अग्रेसर असते, असे शाखा प्रबंधक अस्मिता चव्हाण यांनी सांगितले. रसायनी पाताळगंगा परिसरातील नागरिकांना 'फिट ऑन स्ट्रीट 'या उपक्रमाचा भविष्यात फायदा व्हावा यासाठी आम्ही स्टेट बँकेच्यावतीने परिसरात दुकानदार व इतर व्यावसायिकांना भेटून माहिती देत असल्याचे रसायनी स्टेट बँक शाखा प्रबंधक अस्मिता चव्हाण यांनी बोलताना सांगितले.

## देवी दर्शन





पनवेल : भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी नवरात्रोत्सवानिमित्त मोरावे, बामणडोंगरी या ठिकाणी जाऊन देवींचे दर्शन घेतले. या वेळी पदाधिकारी, कार्यकर्ते, भाविक उपस्थित होते.



उरण : जेएनपीटी टाऊनशिप येथील ऐश्वर्या कला, क्रीडा व सांस्कृतिक मंडळाचे कार्याध्यक्ष तथा कामगार नेते सुधीर घरत व शैलजा घरत यांनी अंबेमातेचे दर्शन घेतले.







उरण : नवरात्रोत्सवानिमित्त मोरा कोळीवाडा येथे ठिकठिकाणी विराजमान देवी.

# चिखलेतील विजय आर्मी स्कूलमध्ये विविध स्पर्धा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील चिखले येथील विजय आर्मी स्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये बुधवारी (दि. २८) बँक ऑफ बडोदा शाखा पनवेल आयोजित प्रतियोगिता स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

बँक ऑफ बडोदातर्फे निवेदिता मिश्रा (क्षेत्रीय कार्यालय नवी मुंबई) व पनवेल बँक ऑफ बडोदा शाखेचे धरमवीर, शाळेचे कमांडर पीव्हीआर कृष्णन, कमांडट व्हीएएस तसेच प्राचार्य एम. के. मराठे, उपप्राचार्य एस. पी. पाटील, पर्यवेक्षक श्री. बिरहाडे, पर्यवेक्षक ए. डी. अहिरे, ज्येष्ठ शिक्षक व्ही. जे. साळुंखे, इतर ज्येष्ठ शिक्षक तसेच शिक्षक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

सामान्य ज्ञान स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक विघ्नेश दत्तात्रय धोंडेकर (इयत्ता आठवी), द्वितीय क्रमांक प्रज्ञेश प्रकाश देवारे (सातवी), तृतीय क्रमांक रुद्र अजित पाटील (सातवी) तसेच गौरव शेखर पाटील (सहावी) व आयुष कृष्णा मुंडकर (सहावी) यांना प्रोत्साहनपर पुरस्कार देण्यात आला.

यासोबतच इयत्ता नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी लघु कहाणी प्रतियोगिता घेण्यात आली. त्यात प्रथम क्रमांक साहिल दशरथ कडाळे (बारावी), द्वितीय क्रमांक हिमेश विनोद गावित (दहावी), तृतीय क्रमांक केशव वडवी (नववी) तसेच या स्पर्धेत निलेश राजेंद्र खांडेकर (दहावी) व पुंडलिक वसंता उघडा (नववी) यांना प्रोत्साहनवर पुरस्कार देण्यात आला. शिक्षक, सैनिक निदेशक, संगणक निदेशक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वी केला.

## उदे गं अंबे उदे!




दुर्गामाता दौड (माळ पाचवी) पनवेल : नवरात्रोत्सवानिमित्त श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान पनवेल विभागाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही दुर्गामाता दौडचे नऊ दिवस आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक उपक्रमाची पाचवी माळ शुक्रवारी नवीन पनवेल येथे गुंफण्यात आली. सेक्टर ७ रिक्षा स्थानकापासून सुरुवात करण्यात आली. नंतर सेक्टर ७मधील विविध सोसायट्यांमधून दौडीने मार्गक्रमण केले. त्यानंतर सेक्टर ९च्या परिसरातून डीएव्ही शाळेसमोरून, संस्कार प्रतिष्ठान आयोजित नवरात्रोत्सवाच्या ठिकाणी जाऊन देवीची आरती केली. त्यानंतर दौड गुरुद्वारासमोरून पुन्हा सुरुवातीच्या ठिकाणी येऊन पूर्ण झाली. दौडदरम्यान देशभक्तीपर गीते गाण्यात आली.

राम प्रहर
वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा

जाणून घ्या साहित्यिकांच्या आवडत्या पुस्तकांविषयी...
महिन्याच्या पहिल्या आणि चौथ्या रविवारी ‘दैनिक राम प्रहर’च्या अंकात वाचा नवे पाक्षिक सदर वाचाल तर वाचाल. या सदरात दर पंधरवड्याला आमच्या प्रिय वाचकांच्या भेटीला आणणार आहोत.
साहित्यिकांची आवडती पुस्तके येत्या २ ऑक्टोबर २०२२ रोजीच्या रविवारी वाचूया डॉ. शीतल मालुसरे (महाड) यांच्या आवडत्या पुस्तकांविषयी त्यांच्याच लेखातून.
वाचाल तर वाचाल!
जाणून घ्या साहित्यिकांच्या आवडत्या पुस्तकांविषयी...

# कालव्यातून पाणी सोडा; अन्यथा उपोषण

## भाजपचे अमित घाग यांचा पाटबंधारे विभागाला इशारा



**धाटाव : प्रतिनिधी**

देखभाल, दुरुस्तीच्या नावाखाली गेल्या काही वर्षांपासून रोहे तालुक्यातील कोलाड ते पडम (उजवा) आणि कोलाड ते भुवनेश्वर (डावा) या कालव्यांत पाणी सोडले जात नाही. या दोन्ही कालव्यांना पाणी सोडण्याबाबत येत्या ७२ तासांत सार्वजनिक पाटबंधारे विभागाने योग्य विचार केला नाही, तर रोहा तहसीलदार कार्यालयासमोर सोमवारी उपोषण करण्याचा इशारा भाजप युवा मोर्चाचे दक्षिण जिल्हा अध्यक्ष अमित घाग यांनी गुरुवारी (दि. २९) पत्रकार परिषदेत दिला.

कोलाड पाटबंधारे विभागाने काळ नदीतून डावा आणि उजवा असे दोन कालवे काढले आहेत. देखभाल, दुरुस्तीच्या नावाखाली पाटबंधारे विभागाने डाव्या कालव्यात पाणी सोडणे बंद केले आहे. त्यामुळे गेल्या आठ-दहा वर्षापासून या कालव्यांना पाणी येत नाही. परिणामी रोहा तालुक्यातील वाशी, लांढर, बोरघर, तळाघर, निवी भागातील उन्हाळी भातशेती इतिहास जमा झाली आहे. भाजीपाला व्यवसायिक रडकुंडीला आले आहेत. मोठमोठ्या झाडांनी माना टाकल्या आहेत. पाटबंधारे विभागाने डाव्या व उजव्या कालव्याचे पाणी शेतकऱ्यांसाठी पुन्हा उपलब्ध करून देण्याची मागणी भाजपच्या वतीने सहा महिन्यापूर्वी करण्यात आली होती. मात्र कोलाड पाटबंधारे विभागाने अद्याप कोणत्याही प्रकारचा खुलासा केलेला नाही. या पार्श्वभूमीवर भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष अमित घाग यांनी गुरुवारी (दि. २९) रोहा शासकीय विश्रामगृहात पत्रकार परिषद आयोजित केली होती. या वेळी पाटबंधारेच्या कारभाराविरोधात सोमवारी उपोषण करण्याचा इशारा घाग यांनी दिला.

जलसंपदा खात्याच्या माध्यमातून रोहा तालुक्यातील डाव्या आणि उजव्या कालव्यांची मोठ्या प्रमाणावर दुरूस्ती करण्यात आली आहे. तरीही या कालव्यामार्फत पाणी मिळत नाही. त्यामुळे कालव्यांच्या दुरुस्तीची कामे निकृष्ट दर्जाची झाली असल्याचे स्पष्ट झाले होते. या प्रकरणी तात्कालीन अभियंता राजेश रिटे त्यांच्यावर कारवाईही करण्यात आली होती. निकृष्ट दर्जाचे काम केल्यामुळे कालव्याला पाणी येत नाही त्यामुळे पाण्याअभावी शेतकऱ्यांना दुपार पीक घेता येत नाही, असे अमित घाग यांनी या वेळी सांगितले.

गेली अडीच ते तीन वर्षे या भागातील पालकमंत्री असल्याने शेतकऱ्यांना मोठी अपेक्षा होती. कोरड्या पडलेल्या कालव्यांमध्ये पाणी पुन्हा वाहू लागेल, अशी अपेक्षा होती. मात्र महाविकास आघाडी सरकार हेच कोरड्या मनाचे असल्याने कालवेही कोरडे राहिले, अशी टिका घाग यांनी केली. आता राज्यात शिंदे-फडणवीस सरकार हे सामान्य जनतेच्या हिताचे सरकार आहे. त्यामुळे या कालव्यांचे पाणी दुबार शेतीला मिळेल, असा विश्वासही घाग यांनी या वेळी व्यक्त केला.

रोहा तालुक्यातील डाव्या व उजव्या कालव्यांचे पाणी येथील शेतकऱ्यांना मिळावे, याकरता भाजप गेल्या काही महिन्यापासून पाठपुरावा करीत आहे. मात्र पाटबंधारे विभागाकडून प्रतिसाद मिळत नाही. येत्या ७२ तासात कालव्यांना पाणी सोडण्याबाबत योग्य तो खुलासा केला गेला नाही, तर सोमवारी उपोषण करण्याचा इशारा कोलाड सार्वजनिक पाटबंधारे विभागाला निवेदनाद्वारे दिला असल्याची माहिती मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष अमित घाग यांनी या वेळी पत्रकारांना दिली. घात यांनी या निवेदनाच्या प्रती रोहा तहसील कार्यालय आणि पोलीस ठाण्याला दिल्या आहेत.

> **रोहा तालुक्यातील किल्ला, धाटाव, वाशी लांढर, बोरघर, निवी, तळाघर येथील ग्रामस्थांनी स्थापन केलेल्या पाणी समन्वय समितीने कालव्यांच्या पाण्यासंदर्भात जो लढा उभा केला आहे, त्याला भारतीय जनता पक्षाचा पूर्ण पाठिंबा राहील. डाव्या व उजव्या कालव्यांना पाणी सोडावे, अशी आमची मुख्य मागणी आहे.**
>
> **-अमित घाग, जिल्हाध्यक्ष भाजयुमो दक्षिण रायगड**

## द्रुतगती मार्गावर बर्निंग टेम्पो



### महामार्ग झाला जाम

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरून चालेल्या आयशर टेम्पोला गुरुवारी (दि. २९) मध्यरात्री खोपोली हद्दीत आग लागली. या घटनेत आयशर टेम्पो जळून खाक झाला. त्यामुळे महामार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी झाली होती.

भिवंडी येथील जय भगवान गोडाऊनमधील मेडिसिनल रसायन भरलेले ५० ड्रम घेऊन आयशर टेम्पो (एमएच-४६,बीएम-००७७) मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरून हैद्राबादच्या दिशेने जात होता. रात्री बारा वाजण्याच्या सुमारास बोरघाटातील मॅजिक पॉईंटजवळ टेम्पोतील ड्रमला आग लागल्याचे चालकाच्या लक्षात आले. त्याने जागीच टेम्पो थांबवून सहकाऱ्यासह बाहेर उडी मारली. क्षणभरात रसायन भरलेल्या ड्रमसह टेम्पोला आगीने वेढले आनि बघताबघता टेम्पो जळून खाक झाला.

खोपोली नगर परिषद, देवदूत यंत्रणा, पातळगंगा एमआयडीसी तसेच उत्तम गलवा, टाटा स्टील, एचपीसीएल या कंपन्यांच्या अग्नीशामक दलांनी ही आग आटोक्यात आणली. अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्था, आयआरबी पेट्रोलिंग, डेल्टा फोर्स, महाराष्ट्र सुरक्षा बल, होमगार्ड इत्यादी यंत्रणांनी वाहतूक पूर्ववत करण्यासाठी प्रयत्न केले.

दरम्यान दोन्ही बाजूच्या लेनवर प्रचंड वाहतूक कोंडी झाली होती, ती पूर्वत करण्यासाठी बोरघाट वाहतूक पोलीस आणि खोपोली पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले. या वेळी काही वाहने बोरघाटातून खोपोलीच्या दिशेने जात असताना कोंबड्यांची वाहतूक करणाऱ्या टेम्पो पलटी झाला यात अनेक कोंबड्या मृत झाल्या.

# दहिवली गावातील समस्या सोडवा

## कर्जत नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांकडे नागरिकांची मागणी




**कर्जत : प्रतिनिधी**

नगर परिषद क्षेत्रात येणाऱ्या दहिवली भागातील नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, त्यामुळे तेथील रहिवाशी त्रस्त आहेत. या परिसरातील दहिवली गाव परिसर विचार मंथ या संघटनेच्या सदस्यांनी कर्जत नगर परिषदेचे मुख्याधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली व त्यांना समस्यांचे निवेदन सादर केले.

कर्जत नगर परिषदेच्या सभागृहामध्ये याबाबत एका बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, मुख्याधिकारी वैभव गारवे, नगरसेविका प्राची डेरवणकर, विशाखा जिनगरे, नगरसेवक विवेक दांडेकर, राहुल डाळिंबकर, संकेत भासे आणि नगर परिषद कर्मचारी उपस्थित होते.

दहीवली गावात पाणी अनियमित येते तसेच येणारे पाणी गढूळ येते, गावासाठी पाणीसाठवण टाकी नाही, गावात कचऱ्याची समस्या जाणवत आहे, विशेषत: लहान व मोठ्या पुलाजवळ नदीच्या पात्रात कचरा टाकला जातो. तिथून येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांना दुर्गंधीला सामोरे जावे लागत आहे, गावात भटकी कुत्री मोठ्या प्रमाणात वाढली आहेत, उल्हास नदीच्या पात्रात सांडपाणी सोडल्याने नदी प्रदूषित झाली आहे, यावर प्रशासनाने योग्य ती कारवाई करावी, दहीवली घाटावर स्वच्छता करावी व शेड बांधावी, स्मशानभूमीमध्ये स्वच्छता करावी व अंत्यविधीसाठी आलेल्या नागरिकांच्या बसण्याची सोय करावी, गावातील सार्वजनिक शौचालयांची देखभाल व दुरुस्ती करावी, गावासाठी स्वतंत्र पाणीसाठवण टाकी बांधावी, असे मुख्याधिकारी वैभव गारवे यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. तसेच यासंदर्भात या वेळी चर्चाही करण्यात आली. या चर्चेत विकास चित्ते, शशांक शेट्टी, प्रविण गांगल, सुनिल जाधव, प्रदीप गोगटे, संजय मोहिते यांनी भाग घेतला.

मुख्याधिकारी वैभव गारवे यांनी नगर परिषद प्रशासनाच्या अधिकारात येणाऱ्या समस्यांचे त्वरित निराकरण करण्यात येईल, असे या बैठकीत सांगितले. अतुल पवार यांनी आभार मानले.



# रिकाम्या मिनीट्रेनची चाचणी

## गाडीचे डब्बे रुळावरून उतरले

**कर्जत : बातमीदार**

दुरुस्तीच्या कामासाठी बंद असलेली नेरळ-माथेरान मिनीट्रेन आगामी काळात सुरु होण्याची शक्यता आहे. त्यासाठी नॅरोगेज मार्गाची युध्दपातळीवर दुरुस्ती केली जात आहे. गुरुवारी (दि. २९) रिकाम्या मिनीट्रेनची चाचणी घेण्यात आली, मात्र या मिनीट्रेनचे डब्बे रुळावरून खाली उतरले. त्यामुळे लवकरच सुरु होईल, अशी अपेक्षा असलेल्या मिनीट्रेनच्या सेवेबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

रेल्वेमार्गाच्या देखभाल व दुरुस्तीकरिता गेल्या दोन वर्षापासून नेरळ-माथेरान मिनीट्रेन बंद आहे. या मार्गावरील नेरळपासून अमनलॉजपर्यंतच्या रुळाखालील सर्व स्लपिअर बदलण्यात येत आहेत. तसेच पावसामुळे होणारे दरडी कोसळण्याचे प्रमाण रोखण्यासाठीही कामे सुरु आहेत. ही कामे अंतिम टप्प्यात आहेत. मध्य रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी या वर्षाच्या अखेरीस नेरळ-माथेरान मिनीट्रेन सुरु होईल अशी अपेक्षा व्यक्त केली होती. त्यासाठी या मार्गावर गुरुवारी मिनीट्रेनची चाचणी घेण्यात आली. या मिनीट्रेनमध्ये मध्य रेल्वेचे अधिकारी होते. ही गाडी माथेरानकडे जात असताना १६८ या पॉईंटवर गाडीचे डब्बे रुळावरून झाली घसरले आणि मिनीट्रेन थांबली.

गाडीचे डब्बे रुळावरून घसरल्याने मिनीट्रेनच्या नेरळ-माथेरान-नेरळ सेवेबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आता मध्य रेल्वेच्या सुरक्षा विभागावर मिनीट्रेनच्या प्रवासीसेवेचे भवितव्य अवलंबून आहे.

# मोकाट कुत्री आणि रस्त्यावरील खड्ड्यांनी खोपोलीतील नागरिक हैराण

## नगरपालिका प्रशासन हतबल

**खोपोली : प्रतिनिधी**

मोकाट कुत्री व रस्त्यांवर पडलेले खड्डे या दोन समस्यांनी खोपोली शहरातील नागरिक मागील काही दिवसांपासून हैराण झाले आहेत. या समस्या दिवसेंदिवस उग्र होत असतांना खोपोली नगरपालिका प्रशासन मात्र त्या सोडविण्यास हतबल असल्याचे स्पष्ट झाले आहे.

खोपोली शहरात मोकाट कुत्र्यांची संख्या प्रचंड वाढली आहे. यातील काही कुत्री पिसाळली असल्याने त्यांच्याकडून शाळकरी विद्यार्थी, महिला व नागरिकांवर अचानक हल्ले होत आहेत. शहरात मोकाट व पिसाळलेल्या कुत्र्यांनी केलेल्या हल्ल्यात नागरिक जखमी झाल्याच्या घटना वारंवार घडत आहेत. या मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यात नगरपालिकेला यश आलेले नाही. दुसरीकडे नगरपालिका रुग्णालयात रेबीजवरील उपचारासाठीचे इंजेक्शन व औषधे उपलब्ध होत नसल्याने बाधित नागरिकांना नाईलाजाने खासगी रुग्णालयात उपचार करुन घ्यावे लागत आहेत. संपूर्ण शहरात मोकाट व पिसाळलेल्या कुत्र्यांची दहशत असून, नागरिकांना हातात काठी घेऊन फिरावे लागण्याची स्थिती निर्माण झाली आहे. दरम्यान, नगरपालिकेकडे कुत्र्यांचे निर्बिजीकरण करण्यासाठी किंवा कुत्र्यांना बंदिस्त ठिकाणी ठेवण्यासाठी कोणतीही यंत्रणा नसल्याने ही समस्या दिवसेंदिवस उग्र होत आहे.

खोपोली शहरातील दुसरी मुख्य समस्या खराब रस्ते, रस्त्यांवर पडलेले खड्डे आणि उडणारी धूळ ही आहे. खराब रस्ते व खड्यांमुळे शहरात विविध ठिकाणी दररोज विचित्र अपघात घडत आहेत. खड्ड्यांत दुचाकी आपटल्याने अनेक नागरिकांना पाठीची दुखापत होऊन वेगळ्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. निधी मंजूर आहे, निविदा मागविण्यात आल्या असून लवकरच रस्त्यांच्या कामांना सुरुवात होईल यापलीकडे मागील अनेक महिने नगरपालिकेकडून काहीही होत नसल्याने नागरिकांत संतापाची भावना वाढीस लागली आहे.



# वाहतूक दर तफावतीमुळे प्रवासीवर्गाची पिळवणूक

**मुरूड : प्रतिनिधी**

महाराष्ट्र मेरीटाइम बोर्डाकडून आगरदांडा आणि दिघीदरम्यान रो-रो सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. दिघी क्वीन आणि सुवर्णदुर्ग मरिन सर्व्हिसेस या दोन कंपन्यांकडून ही जलवाहतूक केली जाते, मात्र आगरदांडा ते दिघी या १५ मिनिटांच्या प्रवासासाठी या दोन्ही कंपन्यांच्या तिकीटदरात तफावत आहे. त्याचा फटका प्रवाशांना बसत आहे. मात्र मेरीटाइम बोर्डाचे त्याकडे दुर्लक्ष होत आहे

दिघी क्वीन व सुवर्णदुर्ग मरिन सर्व्हिसेस या दोन रो-रो सेवेअंतर्गत प्रवाशांना सुविधा पुरविली जाते. एकच व्यवस्था व जाण्याचे अंतरसारखे तरीदेखील गेल्या अनेक वर्षांपासून दोन्ही कंपन्यांच्या तिकीट दरात कमालीची तफावत आहे. गेली अनेक वर्षे हा प्रकार सुरु असतानादेखील तिकीट दरात सारखेपणा येत नसल्याने स्थानिक प्रवासी व पर्यटक यांना विनाकारण जादा रक्कम खर्च करावी लागत आहे. त्यामुळे प्रवासी नाराजी व्यक्त करीत आहेत.

वास्तविक आगरदांडा ते दिघी जलप्रवासाचे सध्याचे भाडे वाजवीपेक्षा जास्त आहे, ते कमी करण्यात यावे. किमान दिघी क्वीनच्या दराप्रमाणे तिकीट दर आकारण्यात यावे, अशी स्थानिक प्रवासी आणि पर्यटकांची मागणी आहे.

> **आगरदांडा-दिघी रो-रो सेवेच्या तिकीट दरातील तफावतीबाबतची माहिती मुंबईतील मुख्यालयाला कळवण्यात आले आहे. त्याबाबत लवकरच सकरात्मक निर्णय होईल.**
>
> **-यशोधन कुलकर्णी, आगरदांडा बंदर निरीक्षक, मेरी टाइम बोर्ड**

**तिकीट दर**

| वाहनांचा प्रकार | सुवर्णदुर्ग मरिन | दिघी क्वीन |
|---|---|---|
| दुचाकी (चालकांसह) | ८० रुपये | ५५ रुपये |
| तीनचाकी | १०५ रुपये | ७७ रुपये |
| चारचाकी (छोटी वाहने) | २०० रुपये | १५४ रुपये |
| चारचाकी (मोठी वाहने) | २२५ रुपये | १७६ रुपये |
| मालवाहू (जड वाहन) | २७५ रुपये, | २२० रुपये |
| बस,ट्रक व टँकर | ४५०रुपये | ३३० रुपये |



# रोहे-पनवेल मेमु गाड्या वाढवाव्यात | मध्य रेल्वेच्या विभागीय व्यवस्थापकांना निवेदन

**धाटाव, रोहा : प्रतिनिधी**

रोहे-पनवेल मेमु गाड्या वाढवाव्यात व स्थानकावर मूलभूत प्रवासी सेवा द्याव्यात या मागणीचे निवेदन मनसे व महाराष्ट्र रेल्वे प्रवासी महासंघाच्या वतीने बुधवारी (दि. २८) मध्य रेल्वेच्या मुंबई विभागीय व्यवस्थापकांना देण्यात आले. हे निवेदन अप्पर विभागीय व्यवस्थापक एच. जी. तिवारी यांनी स्वीकारले. रोहे स्थानकातून प्रवाशांच्या मागणीप्रमाणे सेवा सुरु करण्यासाठी मध्य रेल्वे प्रशासन सकारात्मक असून लवकरच कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन तिवारी यांनी या वेळी दिले.



रोहा स्थानकात रेल्वे गाड्यांच्या फेऱ्या वाढवाव्यात व अन्य प्रलंबित मागण्यासाठी मनसेने सह्यांची मोहीम राबविली होती. हे सह्यांचे निवेदन मध्य रेल्वे विभागीय कार्यालयात देण्यात आले. मनसेचे दिलीप सांगळे, अमोल पेणकर, मंगेश रावकर, अमित पवार, महाराष्ट्र रेल्वे प्रवासी महासंघाचे सुर्यकांत वाघमारे, पत्रकार महादेव सरसंबे, नितीश सकपाळ, पुरुषोत्तम देशमुख, रोहा रेल्वे प्रवासी संघर्ष समितीचे संकेत घोसाळकर, सुरज मुटके, महेश वाडकर, रितेश किर्तने, सत्यवान निमरे आदी उपस्थित होते. या वेळी एच. जी. तिवारी यांनी रोह्यामधील वाढीव रेल्वे सेवा व अन्य समस्या जाणून घेतल्या. आगामी काळात वाढीव मेमु सेवेसह अन्य समस्या मार्गी लागतील असे आश्वासन तिवारी यांनी दिले.

# ग्रंथपाल गजानन मुनेश्वर यांना पीएचडी प्रदान

**मुरूड : प्रतिनिधी**

येथील वसंतराव नाईक महाविद्यालयाचे ग्रंथपाल गजानन मुनेश्वर यांना चुरू (राजस्थान) येथे झालेल्या दिक्षात समारंभात डॉ. जोगेंद्र सिंह यांच्या हस्ते ओपीजेएस विद्यापीठाची पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली.

गजानन मुनेश्वर यांनी 'रायगड जिल्ह्यामधील महाविद्यालयातील ग्रंथालयाचा २०१०-२०१९ मध्ये झालेला विकास' या विषयावरील प्रबंध चुरू (राजस्थान) येथील ओपीजेएस विद्यापीठस सादर केला होता. विद्यापीठाने त्यास मान्यता देवून गजानन मुनेश्वर यांना ही पीएचडी पदवी प्रदान केली. या वेळी व्यासपीठावर चौधरी ओमप्रकाश, डॉ. राजेश कुमार पाठक, डॉ. उपेंद्र सिंह यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

वसंतराव नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मेहबूब नगरबावडी, उपप्राचार्य डॉ. विश्वास चव्हाण यांच्यासह सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी डॉ. गजानन मुनेश्वर यांचे पीएचडी मिळाल्याबद्दल अभिनंदन केले.





पनवेल : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मिडलक्लास सोसायटी मित्र मंडळाच्या वतीने सोसायटी मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या झंकार नवरात्रोत्सवाला पोलीस निरीक्षक श्री. शिंदे आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक शरद ढोले यांनी गुरुवारी भेट दिली. आयोजकांच्या वतीने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांचे स्वागत करण्यात आले. या वेळी माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, भाजपे शहर सरचिटणीस अमरीश मोकल, महिला मोर्चाच्या लीना पाटील, युवा मोर्चा शहर अध्यक्ष रोहित जगताप, खांदा कॉलनी अध्यक्ष अभिषेक भोपी, सुमित झुंझारराव, पत्रकार संजय कदम आदी उपस्थित होते. या वेळी दांडिया नृत्य रंगले.




जय बजरंग कला, क्रीडा व सांस्कृतिक मंडळ, कोपर, पनवेल



महिला मंडळ कराडे बु., पनवेल



जीजेएम इंग्लिश मीडियम स्कूल, खालापूर



सखी महिला बचत गट, वाशी, नवी मुंबई



मुंबई पोर्ट ऑथेरीटी सर्व सामान्य प्रशासन विभाग









# टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी बुमराहच्या जागी सिराजला संधी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दुखापतीमुळे टी-२० विश्वचषकातून बाहेर पडलेल्या जसप्रीत बुमराहच्या जागी वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजचा भारतीय संघात समावेश करण्यात आला आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) ट्विटरच्या माध्यमातून ही माहिती दिली.

ऑस्ट्रेलियात ऑक्टोबर महिन्यात होणाऱ्या टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेतून भारताचा प्रमुख वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह मुकणार आहे. बुमराह पाठीच्या दुखापतीमुळे या स्पर्धेत खेळणार नसल्याचे जवळजवळ स्पष्ट झाले असल्याचे संकेत बीसीसीआयकडून देण्यात आल्याच्या घोषणेनंतर अवघ्या २४ तासांच्या आत बुमराहच्या जागी सिराजला संधी देण्यात आली आहे.

टी-२० विश्वचषकाला तीन आठवड्यांहून कमी कालावधी शिल्लक असून त्यापूर्वीच भारतीय संघाला बुमराह बाहेर पडल्याने मोठा धक्का बसला आहे. सध्या दक्षिण आफ्रिकेविरुद्ध सुरू असणाऱ्या तीन टी-२० सामन्यांच्या मालिकेमध्येही बुमरा संघाचा सदस्य होता, मात्र आता दुखापतीमुळे तो या मालिकेतूनही बाहेर पडला असून त्याच्या जागी मोहम्मद सिराजला संघात स्थान देण्यात आले आहे. सिराजने टी-२० फॉरमॅटमध्ये चांगली कामगिरी केली आहे. आयपीएलमध्येही तो चमकला आहे.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com